किंमत : १० रुपये

नोव्हेंबर २००९

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!


विधानसभा निवडणूक विश्लेषण

गांधीप्रणित अभियांत्रिकी

वेध नोबेल मानकऱ्यांचा

राज्य सरकारकडून अपेक्षा

राज्य युवा धोरण

युतीला मतदारांची चपराक

संपादकीय

हॅट्रिक आघाडीच्या विजयाची




# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ■ | हॅट्रिक आघाडीच्या विजयाची | संपादकीय | २ |
| ■ | श्री. शरद पवार यांची दोन भाषणे | | |
| | १) अन्नसुरक्षेचे ध्येय गाठण्यास सरकार वचनबद्ध | शरद पवार | ८ |
| | २) कृषि विज्ञान केंद्रे : मूलभूत ज्ञानाचे स्त्रोत बनावेत | शरद पवार | १८ |
| ■ | विधानसभा निवडणुकीचे विश्लेषण करणाऱ्या दोन विशेष मुलाखती | | |
| | १) सेनेला 'राज'चे तर भाजपला 'जीनां'चे ग्रहण | छगन भुजबळ | २३ |
| | २) नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना संधी देऊ | आर. आर. पाटील | ३३ |
| ■ | शपथविधी समारंभाची क्षणचित्रे | | ३८ |
| ■ | गांधीप्रणित अभियांत्रिकी हाच प्रगतीचा मूलाधार | डॉ. रघुनाथ माशेलकर | ४२ |
| ■ | विधानसभा : अर्थ-अन्वयार्थ व न्यायपालिका सुधार | विजय नाईक | ४८ |
| ■ | वेध नोबेलच्या मानकऱ्यांचा | एल. श्रीधर | ५७ |
| ■ | नवीन सरकारकडून महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षा नामवंतांच्या मुलाखती | शब्दांकन : डॉ. सुधीर भोंगळे | ६५ |
| | १) सॅटेलाईट टाऊन्स उभारावीत : भालचंद्र देशमुख | | ६६ |
| | २) पाणी आरक्षणाची चर्चा तातडीची : डॉ. माधवराव चितळे | | ६८ |
| | ३) इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी महत्त्वाची : बाबासाहेब कल्याणी | | ७० |
| ■ | सेना-भाजप युतीला मतदारांची चपराक | बंडा सासवडकर | ७२ |
| ■ | महाराष्ट्र राज्य युवा धोरण युवा विकासाच्या ध्येयाकडे | सुप्रिया सुळे | ७६ |
| ■ | जाहला सूर्यास्त राणी | सुलभा तेरणीकर | ८२ |
| | १) सुनीता देशपांडे २) सुमती गुप्ते यांना श्रद्धांजली | | ते ८७ |
| ■ | क्रीडाविश्वावर राज्य क्रिकेटचे ; क्रिकेटवर राज्य ऑस्ट्रेलियाचे | मुकुन्द मोघे | ८८ |



प्रबंध संपादक
**आर. आर. पाटील**
वर्ष पहिले
अंक : **सोळावा**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व प्रबंध संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादक :
**डॉ. सुधीर भोंगळे**

संपादकीय पत्रव्यवहार
राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी : ३०२३५५१८/५५/५६

व्यवस्थापकीय संचालक
**हेमंत टकले**
संकलन सहभाग :
**बाळासाहेब लासुरे**
वितरण व्यवस्था :
**डॉ. गजानन देसाई**
निर्मिती व्यवस्था :
**जितेंद्र गोस्वामी**
मुखपृष्ठ रचना :
**दिलीप रोडे, पुणे**

**वर्गणीचे दर :**
**वार्षिक रु. २००/-**
**आजीव रु. २०००/-**
(दिवाळी अंकासह)

हे मासिक
www.mhncp.org
यावर उपलब्ध आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. आर. आर. पाटील यांनी मयुर प्रिंटर्स, ५०६/मयुरेश, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, मुंबई -३३ येथे छापून राष्ट्रवादी भवन, शासकीय कुटीर क्र. २१, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई - २१, येथून प्रकाशित केले.

## संपादकीय



# हॅट्रिक आघाडीच्या विजयाची

महाराष्ट्रात शांतपणे पार पडलेल्या २००९ च्या विधानसभा निवडणूक निकालांचे सर्वच लोकशाहीप्रेमींनी मनापासून स्वागत केले पाहिजे. अर्थातच निकालामुळे काहींना आनंद वाटेल, काहींचा विरस होईल. पण यावर उपाय नाही. आपल्या स्वतःच्या व्यक्तित्वाविषयी आणि पक्षाच्या कर्तृत्व व नावलौकिकाबद्दल राजकीय नेते व नेतृत्वाचा जो भ्रम असतो त्याचा भोपळा वास्तवतेच्या खडकावर आदळून फुटतोच आणि आपल्या खऱ्या आकाराचे भान होऊन नमण्याची व सत्याकडे जाण्याची थोडी तसदी आपण घेतली पाहिजे याची जाण सेना-भाजप युतीच्या नेत्यांना या निकालाने आली असेल अशी अपेक्षा आपण करायला हरकत नाही.

''कोणत्याही परिस्थितीत भगवा यावेळी विधानभवनावर फडकणारच'' आणि ''राज्याचा मुख्यमंत्री मीच ठरविणार'' अशी उन्मत्त विधाने करणाऱ्या उद्धव-राज या बंधूंच्या पोकळ वल्गना व मुक्ताफळांना आम्ही काडीचीही भीक घालत नाही हे ढळढळीत सत्य मतदारांनी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला घवघवीत यश देऊन फार ठसठशीतपणे जनतेच्या निदर्शनाला आणून दिले आहे. कारण शेवटी नेतृत्वाचे प्रत्यक्ष जीवन व त्याचा आदर्श यांच्यात अंतर आहे. म्हणूनच साधनेला अवकाश आहे. पण साधन आणि साध्य यांच्यात विषमता असता कामा नये. साध्य पूर्ण असते; साधण अपूर्ण असते. तरी देखील साध्य-साधनात साधर्म्य मात्र असावेच लागते. साध्य-साधनात अंतर असल्यामुळे आपल्या उक्ती व कृतीत अंतर पडत जाऊन ढोंग व दांभिक मुखवटा आणि असत्याची मळमळ बाहेर पडल्याशिवाय राहातच नाही याचेही दर्शन या निवडणुकीच्या निमित्ताने जनतेला झाले आहे.

सर्वच पक्षांनी निवडून दिलेल्या उमेदवारात तरूण आमदारांचे व नवीन चेहऱ्यांचे प्रमाण ठळकपणे नजरेत भरावे इतके मोठे आहे ही गोष्ट मोठी स्वागतार्ह आहे. मात्र या निवडणुक प्रचारात महाराष्ट्र राज्याच्या हिताकरीता म्हणून काय धोरणे स्वीकारली पाहिजेत आणि कोणत्या उपाययोजना आवश्यक व व्यवहार्य आहेत याचा तितक्याशा गांभीर्याने कोणीच खल व विचार केलेला दिसत नाही ही गोष्टही तितकीच खेदाची आहे. निंदाखोर व दूषित मनोवृत्तीच्या कुटाळक्यांच्या टीका आणि त्याही 'खोटं बोल पण रेटून बोल' या वृत्तीने करण्यापर्यंत युतीच्या नेत्यांनी जाणिवपूर्वक मजल मारल्यामुळे नीतिमान, सभ्य व विचारी मतदारांनी शांत व संयमपणा राखीत आणि वृत्तीत कटुतेचा लवलेशही येऊ न देता ज्या निर्धाराने मतदान यंत्रातून आपला हक्क, विचार व मत निर्भिडपणे मांडले ते पाहिल्यावर आघाडीला मतदान करणाऱ्या मतदारांचे करावे तेवढे अभिनंदन थोडेच आहे. असे असले तरीही राज्याच्या विकासाचा भाग म्हणून अनेक

कामांचा डोंगर उभा करीत असताना नवीन निर्मितीत माणसांची भंगलेली मने जुळवणे, विदारलेली हृदये सांधणे, पांगलेली बुद्धि सावरणे आणि त्याग केलेल्या व्यक्तींच्या पदरात त्यांच्या त्यागाचे यथोचित मूल्यमापन करून माप टाकणे याचा विचार कुणीच फारशा गांभीर्याने करीत नाही हे ही विदारक सत्य या निमित्ताने समोर आले आहे.

या निवडणुकीत बंडखोरी करून निवडून आलेल्या आमदारांची संख्या ३० आहे. त्यातच संख्याबळाचा जो कौल मिळाला आहे त्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला बंडखोरांची फार मिजास राखण्याची व पाठिंब्यासाठी हातापाया पडून व त्यांच्या मागण्या पूर्ण करून मनधरणी करण्याची फारशी गरज पडली नाही ही ही गोष्ट चांगली झाली. अन्यथा अगोदरच 'अर्थपूर्ण' झालेल्या या निवडणुकांना अपक्षांच्या घोडेबाजाराची व सौदाबाजीची झालर प्राप्त होऊन बिनदिक्कत व सडेतोडपणाने आघाडीच्या पाठिशी उभ्या राहिलेल्या जनतेच्या आनंदावर विरजण पडले असते.

२००४ सालच्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला ११ जागा कमी मिळाल्या होत्या. पक्षाने ११२ जागी अधिकृतपणे आपले उमेदवार उभे केले होते. त्यातील ६२ उमेदवार निवडून आले. यशाचे हे प्रमाण ५५ टक्के आहे. काँग्रेसने १७४ जागा स्वतःकडे घेऊन त्यातल्या दोन गवई गटाला दिल्या होत्या. म्हणजे प्रत्यक्षात १७२ जागा त्यांनी लढविल्या. त्यापैकी ८२ जागी त्यांचे उमेदवार विजयी झाले. यशाचे हे प्रमाण ४७ टक्के आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेले यश हे जास्त चांगले, ठाशीव व ठळकपणे नजरेत भरण्यासारखे आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी अपेक्षित यश न मिळाल्यामुळे मानहानी सोसावी लागलेल्या व त्यामुळे पदरी काहीसे नैराश्य आलेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी मागील पराभवाची सल व शल्य यावेळी भरून काढण्याचा निर्धार करून आपली सर्व ताकद एकवटण्याचा प्रयत्न केला. अर्थात सर्वांनीच याला अंग झाडून साथ दिली असे म्हणणे थोडे धाडसाचेच आहे. बंडखोऱ्या शमल्या असत्या, नेत्यांनी स्वतःच्या स्वार्थाला आवर घालून घरभेदेपणाचे वर्तन केले नसते आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने व एकदिलाने अंगचोरपणा न करता तनमनधनाने जेवढीअसेल तेवढी सारी ताकद पणाला लावली असती तर राष्ट्रवादी काँग्रेसला आजच्यापेक्षाही अधिक दैदीप्यमान यश मिळू शकले असते. मागच्या विधानसभेच्या तुलनेत यावेळी ९ जागा आपल्याला कमी मिळाल्या आहेत आणि १० जिल्ह्यात आपला एकही उमेदवार निवडून आलेला नाही याचे भान राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने बाळगून आजपासूनच या उणिवा दूर करण्यासाठी कामाला लागले पाहिजे.

अर्थात मतदारांनी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाचा एकमुखी स्वीकार केला आहे ही गोष्टही दिलासा देणारी आहे. अजूनही महाराष्ट्रात त्यांच्यासारखी लोकमताची नाडी ओळखणारा, महत्त्वाच्या सर्व प्रश्नांवर धोरणविषयक अभ्यास असणारा, त्यातील खाचाखोचा जाणणारा आणि दूरदृष्टी व त्याच वेळी व्यवहार्य अशी धोरणे स्वीकारणारा त्यांच्या इतका जाणता दुसरा कोणताही नेता नाही. मंत्रिमंडळ करताना राष्ट्रवादीच्या वाट्याला ज्या जागा आल्या त्यांचे वाटप करताना श्री. शरद पवारांची दूरदृष्टी दिसून आलेली आहे. त्यांचा प्रदीर्घ राजकीय अनुभव व शहाणपणा यातून व्यक्त झालेला आहे. विशेष म्हणजे पुढच्या पिढीतल्या नेतृत्वाला त्यांनी चांगलाच वाव मिळवून दिला आहे. त्याचप्रमाणे मराठा सोडून बाकीच्या सर्व जातीजमाती यांनाही त्यांनी सत्तेचा वाटा दिलेला आहे. आता या नव्या टीमने चांगली कामगिरी करून दाखवावी अशी सर्वांचीच अपेक्षा राहील.

शरद पवारांच्या नेतृत्वाचा मनोमनी स्वीकार केल्यानेच पक्षाचे आणि पक्षीय आमदारांचे हित होणार आहे ही गोष्ट राष्ट्रवादीच्या सर्वांनीच ओळखली आहे आणि निवडणूक निकालानंतर ज्या काही हालचाली झाल्या त्यावरून ही गोष्ट स्पष्टही झाली आहे. श्री. पवार यांची प्रचंड मेहनत, पाठबळ, मार्गदर्शन, आशीर्वाद व अनुग्रह यामुळेच यशाचा गोड दिवस चाखता आला आहे. अर्थात अनुग्रह जिरवायलाही पात्रता लागते; सामर्थ्य लागते. ते मंत्री, आमदार व कार्यकर्ते यांच्यात काही प्रमाणात का होईना पण निश्चित असल्यामुळे यश, विकास व जनकल्याणाच्या दिशेने नेण्यात राष्ट्रवादी काँग्रेस निश्चित यशस्वी होईल याविषयी कुणीही शंका बाळगण्याचे कारण नाही. त्यामुळेच विजयाचा हा कृपाप्रसाद ज्या श्री. शरद पवार यांच्यामुळे लाभला त्यांच्याच पायी तो अर्पण करणे आणि तशी भावना काम करताना सतत मनात बाळगणे हा नावलौकिक प्राप्त करण्याचा एकच उपाय आहे. अन्यथा एरव्ही 'अनेकचित्त विभ्रांता मोहजाल समावृता: । भ्रमले चित्त भेदूनी मोहजालांत गुंतले' अशी दशा व्हायची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून नित्य सावध व जागरूक राहून

क्षणिक स्वार्थाला व मोहाला मागे टाकण्याची वृत्ती प्रसंगी प्रयत्नपूर्वक का होईना पण विकसीत करावीच लागेल.

''मंत्रिपद मिळाले म्हणून पक्षसंघटनेकडे कोणी दुर्लक्ष केले तर चालणार नाही. मंत्र्यांनी पक्ष संघटनेची ताकद वाढविली पाहिजे, त्याच बरोबर मंत्रिपदी चांगली कामगिरी बजावून पक्षाची प्रतिमा उंचावली पाहिजे.'' असा ८ नोव्हेंबर, २००९ च्या मंत्र्यांच्या बैठकीत राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी दिलेला कडक इशारा पुरेसा बोलका, अचूक, समर्पक व सर्वथा यथायोग्य असा आहे. त्यामुळे निवडून आलेल्या आमदार व मंत्र्यांना आपल्याला मिळालेली पदे व सत्ता ही पक्षामुळेच लाभलेली आहेत आणि पक्षापेक्षा कुणीही मोठा व श्रेष्ठ नाही याचे भान कायम राहील अशी आशा करण्यास बराच वाव आहे.

आजवरचा इतिहास काहीही असो. यापुढे तरी पक्षातर्फे निवडून आलेल्या आमदारांनी निव्वळ वैय्यक्तिक लाभाचा विचार न करता अभ्यास केला पाहिजे. धोरणविषयक चिंतन केले पाहिजे. यातच त्यांचे वैय्यक्तिक हित आणि जनसामान्यांचे कल्याण सामावलेले आहे. प्रत्येक आमदाराने जरी विविध व सर्व विषयांचा अभ्यास केला नाही तरी त्यांच्या त्यांच्या आवडीच्या विषयांमध्ये भरपूर वाचन व चिंतन करून धोरणे ठरविण्यासाठी लागणारी अनुभवाची वैचारिक शिदोरी पुरविण्याची भूमिका घेतली तर ती गोष्ट सर्वांच्याच हिताची ठरेल.

आघाडी सरकारच्या कामात सुसुत्रता व एकजिनसीपणा आणण्यासाठी गरज असल्यास लिखीत वा अलिखीत कशी का होईना पण एक आचारसंहिता बनविण्याची व तिचे सर्वांनी कसोशीने पालन करण्याची नितांत आवश्यकता आहे. जेणेकरून घरात वाजलेल्या भांड्यांचा आवाज शेजारपाजाऱ्यांना, जगाला आणि विरोधकांनाही ऐकू जाणार नाही व काम आणि निर्णयांची दिशा व्यापक जनहिताचीच राहील.

विकासाच्या व नवनिर्मितीच्या महान कल्पना अक्षय बीजाप्रमाणे असतात. त्यांना अंकुर फुटायला वेळ लागतो. ज्यांना लवकर अुंकर फुटतात ती रोपे मरूनही लवकर जातात. त्यामुळे जे विचार फार शक्तिशाली आणि अधिक चिरंजीवी असतात ते जनमानसात उगवायला वेळ लागतो. ते पेरता क्षणीच उगवलेले दिसत नाहीत. पण याचा अर्थ असा नाही की त्यांचा लोप होतो. ते भूमीमध्ये एकरूप होऊन आतमध्ये विकसीत होत राहतात. कित्येक विचार अक्षय असतात, क्षीण असतात. क्षीण विचार लवकर उगवलेले आढळतात पण ते उगवतात अन् नष्ट होतात. इतिहासात त्यांना काहीही स्थान नसते. ही गोष्ट शिवसेना आणि मनसेच्या मराठी भाषेच्या व मराठी माणसांच्या क्षणिक, ढोंग, स्वार्थी व मतलबी आग्रहीपणाबाबत अगदी तंतोतंत खरी आहे. त्यामुळे लहान-मोठे इतिहासकार, वाचन व चिंतनाची बैठक नसलेले आणि पेड न्यूजच्या आधाराने जगत असलेले वर्तमानपत्रांचे भाष्यकार व इलेक्ट्रॉनिक चॅनेल्सवाले काहीही लिहोत, काहीही दाखवोत आणि वाचणारे व पाहणारे भले ते वाचोत किंवा पाहोत; पण दीर्घकाळात त्यांचे थोडेसुद्धा अस्तित्व टिकलेले नसते. या निवडणूक निकालाने हे सिद्ध केले आहे. अन्यथा शिवसेनेचा डरकाळ्या फोडणारा वाघ या निवडणूकीत शरपंजरी होऊन धारातीर्थी पडला नसता आणि भाजपला जीनांच्या ग्रहणाने ग्रासून हिंदुत्वाच्या धरसोडीने धोबीपछाड केले नसते.

आघाडीला पर्याय म्हणून लोकांनी युतीला सलग तिसऱ्यांदा स्वीकारले नाही याबाबतची कारणमीमांसा संबंधित काय करायची ती करोत पण या यशाने आपणही हुरळून जाता कामा नये. आपले पाय जमिनीवर ठेवून ते कायम मातीतच आहेत ना हे तपासत राहावे लागेल. लोकांना दुसरा पर्याय नाही म्हणून आघाडी ठीक वाटली आहे. तथापि केंद्र व राज्य सरकारने राबविलेल्या सर्व योजनांचा फायदा खऱ्या गरजू व शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतो की नाही याचा अभ्यास अजून बाकी आहे. आघाडीची मते जवळपास लोकसभेएवढीच राहिलेली आहेत. ती वाढून जास्त सकारात्मक पाठिंबा मिळणे अधिक महत्वाचे आहे. सगळ्या राज्यात व भागात पक्षाचा अजूनही पुरेसा प्रचार व प्रसार झालेला नाही. विदर्भ-मराठवाड्यात पक्षाच्या विस्ताराला अजून बरीच संधी आहे. पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे असे पूर्वी म्हटले जायचे. आता तिथे इतर पक्षांचीही घुसखोरी होऊन राष्ट्रवादीत एकजिनसीपणा राहिलेला दिसत नाही. या व इतर सर्व संबंधित प्रश्नांबाबतचे चिंतन नेते व कार्यकर्ते यांनी एकित्रतपणे करण्याची गरज आहे.

निवडणुकीच्या रिंगणातील रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील तिसरी आघाडी म्हणजे आवळ्या भोपळ्याची मोट होती. त्यांच्यात कोणताही वैचारिक समान धागा नव्हता. त्यातही रिपब्लिकन नेत्यांनी सर्वांची अतिशय उपेक्षा व निंदा करणारी विधाने श्री. आठवले यांचा लोकसभेला पराभव

झाल्यापासून सातत्याने केली. जनमताला हे रुचलेले दिसत नाही. शेतकरी कामकरी पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्या नेहमीच्या जागा त्यांनी जिंकल्या आहेत. पण सोलापूरची महत्त्वाची जागा त्यांनी गमावलेली आहे. शेकाप ठराविक जागांमधून निवडून आलेला असला तरी तिसरी आघाडी नावाचा बुडबुडा यावेळी फुटलेला आहे. त्यामुळे राजकारणातल्या भावी युतींचा मार्ग बराचसा मोकळा व स्पष्ट होऊन आठवलेंची अवस्था तेल गेले तूप गेले, हाती धुपाटणे आले अशी झाली आहे. गेली अनेक वर्षे आपण उगाचच आठवलेंचे लाड पुरवित राहिलो अशी भावनाही आता आघाडीच्या नेत्यांमध्ये घर करून राहिलेली आहे. मनसेच्या राज्यातील वाढीलाही फार मर्यादा आहेत. हे निकालातून जाणकारांच्या लक्षात आले आहे. कोणताही विकासाचा प्रभावी आर्थिक कार्यक्रम व ध्येयवाद नसलेला मनसे राज्यात सर्वत्र स्वतःचा वेगळा दबदबा निर्माण करू शकेल अशी शक्यता आता दिसत नाही.

शिवसेनेचा मुंबईतला बालेकिल्ला ढासळत चालला आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीच्या थोड्याशा अंतर्गत कलहामुळे व नेत्यांनी किरकोळ एक-दोन जागांवरून प्रश्न प्रतिष्ठेचा केल्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आघाडी होऊ शकली नाही. अन्यथा त्याच वेळी युतीची महापालिकेतील सत्ता संपुष्टात आली असती. मुंबई महापालिकेतून मिळणाऱ्या मलिद्यावरती आज सेना उड्या मारते आहे. पण त्यांनी लक्षात ठेवावे की त्यांच्या नावातच नुसता 'सेना' हा शब्द आहे. वेदात 'सेना' हा शब्द आहे. 'असेन्या वः पणयो वचांसि' - हे शिवसैनिकांनो ! तुमचे म्हणणे असैन्य आहे, सेनारहित आहे. म्हणजे तुमच्या वाणीत शक्ति नाही, अथवा तुमच्या बोलण्यात संगती नाही, तुमचे बोलणे असंगत आहे. 'सेना' शब्दाचा अर्थ आहे, जिवावर उदार झालेले असे लोक, ज्यांच्यात संगती आहे. शिवसेनेत आणि भाजपतही असे दमदार, करिष्मा असलेले नेतृत्व राहिलेले नाही. त्यामुळे स्थानिक राजकारणातले काटशह, शहाणपणा, जातींचे गणित आणि संख्यात्मक बांधणी यात युती मागे पडते आहे.

दक्षिण महाराष्ट्रात काँग्रेसची अंगभूत ताकद मोठी असली तरी अंतर्गत कलहामुळे मोठा फटका बसून बऱ्यापैकी जागा विरोधक व बंडखोरांनी जिंकल्या आहेत. जातीय दंगलींचा वापर करून निवडणुका जिंकता येतात यावर सांगली, मिरज, इचलकरंजी, कोल्हापूर येथील निकालांनी युतीचा विश्वास दृढ होतो आहे. हे चित्र फारसे चांगले नाही. ते आपल्याला प्रयत्नपूर्वक व लोकांचा विश्वास पुन्हा संपादन करून बदलावे लागेल. त्यासाठीची मार्गक्रमणा आखून ती आत्तापासूनच अंमलात आणावी लागेल. थोडक्यात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी या विजयावर अल्पसंतुष्ट न राहता पक्षाचा विस्तार व विश्वासार्हता वाढीला लावण्याकडे लक्ष देऊन राज्यासमोरील आव्हानांचाही समर्थपणे मुकाबला करण्याच्या दृष्टीने तयारी केली पाहिजे.

राज्यापुढे आज अनेक निरनिराळ्या प्रकारची आव्हाने आहेत. राज्य हे देशाच्या पातळीवर उत्तम विकास करणारे तसेच भांडवली गुंतवणूक आकर्षित करणारे राज्य असले तरी याच सुबत्तेमुळे शहरांकडे जाणारा लोंढा, पायाभूत सुविधांवर पडणारा तणाव व बोजा आणि त्यामुळे कृषी क्षेत्रातही उद्‌भवत असलेल्या समस्या या सर्वांचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. कृषी क्षेत्र जरी विकसीत होत असले तरी पीकांची घनता आणि विविधता, पीकपद्धतीतील बदल व त्यामुळे व्यवसायांचे बदलत असलेले स्वरूप आणि शहरांची वाढती लोकसंख्या व तीचा कृषीक्षेत्रावर पडणारा प्रचंड बोजा हे प्रश्न गुंतागुंतीचे होत आहेत. मराठवाडा, विदर्भ, कोकण येथेही नवनवीन प्रश्न रोज निर्माण होत आहेत.

कृषी क्षेत्र जरी विकसीत होत असले तरी बहुसंख्य भूधारक हे मुख्यत्वे अल्पभूधारक असून त्यांची संख्या खूप मोठी असल्याने नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात बऱ्याच अडचणी येत आहेत. या अल्पभूधारकांची शेतीची उत्पादकता व उत्पन्न कसे वाढवावयाचे हे आव्हान आ वासून उभे आहे. ते स्वीकारावेच लागेल. जागतिक बँकेने सुचविल्याप्रमाणे ग्रामीण भागातच कृषी प्रक्रिया उद्योग व बिगर कृषी उद्योग तसेच शहरांच्या निगडीत सेवा क्षेत्र उभे करून शेतकऱ्यांच्या तरूण मुलामुलींना नोकरी व व्यवसायाची नवनवीन क्षितीजे उपलब्ध करून दिली पाहिजेत. यात कौशल्य विकास हा कार्यक्रम अतिशय प्रभावीपणे राबविला पाहिजे व त्याकरिता उच्च शिक्षण विभाग, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि कृषी व सहकार या सर्व विभागांनी एकत्रित येऊन कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाला वाहून घेतले पाहिजे. येथून पुढे शेतकरी व बाजारपेठा यांचा समन्वय योग्य पद्धतीने करून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळवून देणे, वाहतुक साखळी उभारणे व सर्वात महत्वाचे म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्याला बाजारपेठेशी व बाजारपेठेला

शेतकऱ्याशी जोडण्याचा उपाय तातडीने करावा लागेल. इंटरनेट, मोबाईल सर्व्हिसेस यांचा वापर करून हे साधता येईल.

शेतकऱ्याला कर्ज पुरवठा मोठ्या प्रमाणात व कमी व्याजाने करावयाचा निर्णय जरी क्रांतीकारी व प्रशंसनीय असला तरी प्रत्यक्षात सहकारी संस्था व बँका किती मोठ्या प्रमाणावर कर्ज देतात यावरच योजनेचे यश सामावलेले आहे. कारण गेल्या चार-पाच वर्षांत कर्ज पुरवठा वाढलेला आहे. पण कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढलेली नाही हे ही कटु सत्य आहे. विदर्भ-मराठवाड्यातील सहकारी संस्था म्हणजे मुख्यत्वे सहकारी बँका कशा कार्यरत राहतील यासाठी एखादा विशेष कार्यक्रम राबविला पाहिजे अन्यथा कमी व्याजदराची संकल्पना फक्त कागदावरच राहील आणि या योजनेचा फायदा फक्त पश्चिम महाराष्ट्रालाच होईल. याकरिता दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांनी आपापल्या जिल्ह्यातील सहकारी संस्था व्यवस्थित चालू ठेवणे, महिला बचत गटांना प्रभावी व सक्षम करणे आणि त्यांना कर्ज पुरवठा करणे हा कार्यक्रम मोहिम म्हणून सलग पाच वर्षे राबविला पाहिजे. तरच शेतीचा विकास व दारिद्र्य निर्मूलन हे कार्यक्रम राबविण्यात शासन यशस्वी होईल.

प्रक्रिया उद्योगाला जरी प्रचंड वाव असला तरी या उद्योगाला अत्यंत प्रभावी अशा मार्केटिंग साखळीची जोड देण्याची गरज आहे. यात पणन बोर्डाने ब्रँन्ड विकसीत करणे, बाजारपेठांची ओळख करून देणे, बाजारपेठा व त्यासंबंधीची साक्षरता वाढविणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बाजारपेठांपर्यंत कृषीमाल चांगल्या स्थितीत जाण्यासाठी रस्ते व वाहतुकीची सुविधा करणे आवश्यक आहे. जगातील यशस्वी कृषीनिर्यातक देशांपासून (ब्राझील, थायलंड, केनिया) आपणांस एकच शिकता येईल ते म्हणजे शेत ते गाव आणि गाव ते बाजारपेठ अशी रस्त्यांची जाळी उत्कृष्ट दर्जाची असली पाहिजे.

राज्यातील दुर्गम भागातील शेतकऱ्यांचा खताचा उपभोग वाढविणे आवश्यक आहे. यासाठी गेल्या वर्षी शासनाने जी बफर स्टॉकची योजना राबविली ती यापुढेही कार्यक्षमपणे चालविली पाहिजे. यामुळेच राज्यातील पूर्व विदर्भ तसेच मध्य विदर्भ व मराठवाड्यातील अविकसीत भागात खत पुरवठा करणे शक्य झाले. यासाठी आवश्यक असल्यास वाहतुक व साठवणूक अनुदान देऊन खतांचा उपभोग वाढविला पाहिजे. सर्व पीकांमध्ये खतांचा वापर वाढविला तरच अन्नधान्याचे उत्पादन, उत्पादकता व उपलब्धता वाढू शकेल.

राज्यातील उद्योगांच्या विकासाची गती जरी समाधानकारक असली तरी इतर राज्यांच्या तुलनेत या क्षेत्राची गेल्या काही वर्षात बरीच पीछेहाट झालेली आहे हे मान्य करावे लागेल. आपल्या राज्यात उद्योगाचा विकास सर्वदूर राज्यभर होण्यासाठी विशेष कार्यक्रम आखण्याची गरज आहे. यामध्ये भूसंपादन, वीज पुरवठा व कनेक्शन यांचे प्रश्न असतील तर ते प्राधान्याने सोडविले तरच उद्योजकांना आकर्षित करता येईल. अनेक मोठे व लघु उद्योग आज निरनिराळ्या कारणांनी बंद पडले आहेत. याला जागतिक मंदीचे कारण काही प्रमाणात जबाबदार असले तरी आपल्या नियोजन व प्रशासनाच्याही गंभीर उणिवा व चुका आहेत हे मोकळेपणाने मान्य करण्याची गरज आहे. उद्योगासाठी आपली बंदरे मोठ्या प्रमाणात विकसीत व्हावीत व बंदरांच्या भोवती गुजरातमधील कांडला व आंध्र प्रदेशातील वैझाक या ठिकाणी घेतलेला नियोजनाचा दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज आहे.

सेवा क्षेत्रातही खूप आव्हाने सरकार समोर आहेत. राज्यात शैक्षणिक सुविधा प्रचंड उपलब्ध असल्याने कुशल कामगारांची संख्याही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. या कामगारांना पुरेशा संधी व मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आणि जनतेच्या सहमतीने चीनसारखी विशेष आर्थिक क्षेत्रे (एसईझेड) विकसीत केली तर भारतातीलच काय पण आशिया खंडातील एक प्रगतशील राज्य असा नावलौकिक महाराष्ट्राला प्राप्त होण्यास वेळ लागणार नाही. पण यासाठी जोड द्यावी लागेल ती मुलभूत सोयींच्या नियोजनाची व प्रभावी अंमलबजावणीची. याशिवाय आपल्याला विशेष करून राज्यातंर्गत रस्ते निर्माण करून ते प्रभावीपणे जिल्ह्याजिल्ह्यांना व मोठ्या शहरांना जोडले पाहिजेत. म्हणजे राज्याची अंतर्गत बाजारपेठेची व्याप्ती व आकार वाढेल. राज्याला ७२० कि.मी. लांबीचा जो समुद्रकिनारा लाभलेला आहे तो पर्यटन व जलवाहतुकीसाठी अतिशय प्रभावीपणे वापरात आणला पाहिजे. गुजरात व आंध्र प्रदेश यांनी या क्षेत्रात दूरगामी नियोजन केल्यामुळे त्यांची फारच प्रगती झालेली आहे. पर्यावरणाच्या समस्या या लोकसंवादातून सोडवाव्या लागतील अन्यथा विकासाची गती मोठ्या प्रमाणात खुंटली जाईल हे विदारक सत्य आहे.

मुंबई व बृहन्मुंबईच्या विकासाकडे जाणिवपूर्वक लक्ष देऊन त्यासाठी मोठी गुंतवणूक व नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये शहराचा विकास, मेट्रो रेल्वे, अंतर्गत रस्ते,

पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था या व इतर सर्व बाबींकडे जाणिवपूर्वक लक्ष देऊन व जेएनयुआरएम सारख्या योजनेतून मोठ्या प्रमाणावर केंद्र सरकारचा पैसा वापरून विकासकामे करण्यात येत आहेत. नियोजनाची ही वाटचाल योग्य दिशेने होते आहे. परंतु यात अंमलबजावणी करणाऱ्या सर्व प्रशासकीय संस्था, महापालिका, एमएमआरडीए, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि अन्य संबंधीत संस्था यांच्यात योग्य समन्वय साधण्यासाठी एखादी यंत्रणा उभारावी लागेल. अन्यथा मुंबई शहराचे प्रश्न यापुढेही तसेच अनुत्तरीत राहतील.

सर्वात महत्वाचे म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने तयार केलेला मुंबई वित्तीय राजधानीचा अहवाल राबविण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या सहकार्याने तात्काळ प्रयत्न केले पाहिजेत. कारण सिंगापूर, टोकिओसारखे जागतिक वित्तीय केंद्र मुंबईत निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणावर विकास होऊन रोजगाराचे प्रश्न सुटण्यास हातभार लागेल. मुंबई शहरातील झोपड्यांचे पुर्नवसन हा प्रश्न मानवी दृष्टीकोनातून पाहिला जात आहे परंतु त्याशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे या झोपडपट्टीत उपलब्ध असलेले कुशल कामगार व मनुष्यबळ या शहराला जे फार मोठे योगदान देतात ते लक्षात घेता निवासी व्यवस्थेबरोबरच कौशल्य विकासाचे समुह (पार्क्स) विकसीत करण्याची गरज आहे.

मुंबई शहराशिवाय पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती यासारखी शहरेही अतिशय प्रभावीपणे विकसीत केली पाहिजेत. मुंबईचे आकर्षण कमी करून समांतर पातळीवर इतर मोठ्या शहरांचा विकास सर्वंकषदृष्ट्या करणे हेच याला उत्तर आहे. शहरांचा विकास हा अतिशय नियोजनबद्ध व रचनात्मक दृष्टीने करण्याची गरज आहे. कारण ग्रामीण दारिद्य व मागासलेपणा घालविण्यासाठी ही एक मोठी प्रभावी उपाय योजना आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. शहर विरुद्ध ग्रामीण अशी संकल्पना न ठेवता ते एकमेकांना पुरक आहेत अशी रचना व संकल्पना मांडण्याची गरज आहे. शहरांच्या वाढीमुळे ग्रामीण भागातील शेती पदार्थांना मागणी वाढते, रोजगारासाठी मजुरांची मागणी वाढते, शहरांमुळे उच्च शिक्षणाच्या सोयी ग्रामीण भागांना उपलब्ध होतात हे नाकारून चालणार नाही. ग्रामीण भागातील तरूण आज शेतीकडे आकर्षित होत नाही. त्यासाठी त्यांच्या बुद्धीला व श्रमाला योग्य दिशा देऊन व त्या तरूणांना प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य वाढविण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

मानव विकास हा राज्याचा दुर्लक्षित विषय आहे हे मान्य केल्यासच पुढील दिशा स्पष्ट होईल. यामध्ये मानव विकास निर्देशांक याकडे लक्ष द्यावेच लागेल. पण या सर्व क्षेत्रात आज जे विविध कार्यक्रम राबविले जातात (उदा. बाल कुपोषण व इतर) त्यासाठी निधी पुष्कळ उपलब्ध आहे पण फलनिष्पत्ती मात्र अत्यंत निराशाजनक आहे. कारण हे सर्व कार्यक्रम एकत्रितपणे राबविण्याची गरज आहे. त्यासाठी राज्य स्तरावर मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून आणि त्याला पूर्ण अधिकार देऊन जबाबदार धरले पाहिजे. याशिवाय ग्रामविकास, महिला व बालकल्याण, आदिवासी विकास सामाजिक न्याय व शिक्षण या सर्व मंत्र्यांचा एक टास्क फोर्स निर्माण केला पाहिजे. वरीष्ठ मंत्र्याला या टास्क फोर्सचे अध्यक्षपद देऊन प्रभावीपणे मानव विकासाचा कार्यक्रम राबविला पाहिजे तरच या कार्यक्रमांना गती येईल. जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला प्रशासकीयदृष्ट्या सर्व अधिकार देऊन जबाबदार धरले पाहिजे व या विभागातले सर्व अधिकारी, कर्मचारी हे एकाच छत्राखाली आणले तर उद्योग व सेवा क्षेत्रातील प्रगतशील परंतु मानव विकासातील पीछाडीवरचे राज्य ही प्रतिमा आपल्याला पुसता येईल. मानव विकास कार्यक्रमांतर्गत नक्षलवादी क्षेत्रात प्रभावीपणे काम केले पाहिजे. अन्यथा बंदुकीच्या जोरावर नक्षलवादी गेले तरी स्थानिक जनतेचे काय होणार हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. आपल्या प्राथमिक शाळांचा दर्जा, तेथील उत्तीर्ण होण्याची टक्केवारी, पोषण आहाराची अंमलबजावणी, अंगणवाडीचा कारभार, आरोग्य केंद्रांच्या सेवांचा दर्जा या क्षेत्रांमध्ये फारसे स्पृहनीय कार्य चाललेले आहे असे विधान करणे धाडसाचेच होईल. कृषी क्षेत्रातील विकासाबरोबरच मानव विकासातील प्रगती हे या सरकारपुढे मोठे आव्हान आहे. ते दृष्टीआड करता येणार नाही. ही आव्हाने पेलण्यासाठी जनतेने मोठ्या धाडसाने काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या ताब्यात तिसऱ्यांदा सत्ता देऊन त्यांच्या खांद्यावर मोठ्या विश्वासाने मान ठेवली आहे. ती कापली जाणार नाही याची दक्षता आघाडीतले सर्व मंत्री, आमदार घेतील अशी अपेक्षा !







# अन्नसुरक्षेचे ध्येय गाठण्यास सरकार वचनबद्ध

**– शरद पवार**

*नवी दिल्ली येथील ‘शास्त्री भवनात’ ४ नोव्हेंबर २००९ रोजी आर्थिक संपादक परिषद झाली. तिच्या उद्‌घाटनपर भाषणात केंद्रीय कृषी व नागरी पुरवठा मंत्री शरद पवार यांनी व्यक्त केलेले विचार*

आज या परिषदेत आपणासमवेत सहभागी होतांना मला अतिशय आनंद होत आहे. या परिषदेमुळे मला आपल्यापुढे कृषीक्षेत्राची कामगिरी आणि आव्हाने यांचा उहापोह करण्याची संधी मिळाली आहे. या क्षेत्रासंबंधीची आपली मते व विचार आमच्या दृष्टीने फार महत्वाचे असून आगामी कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी तसेच सध्याच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुधारणा घडवून आणण्यासाठी आम्हाला त्याचा उपयोग होणार आहे.

कृषी क्षेत्राच्या दृष्टने २००८-०९ साल खूप चांगले गेले, हे आपण सर्वजण जाणता. गेल्या वर्षी आपल्याकडे २३३.३८ दशलक्ष टन एवढे विक्रमी धान्योत्पादन झाले. त्यात खरीपाचा वाटा ११७.७० दशलक्ष टनांचा राहिला. आमच्या शेतकऱ्यांच्या मेहनतीमुळेच हे सारे घडू शकले. अर्थात त्यांच्या प्रयत्नांना सरकारच्या नव्या प्रागतिक व्यवहार्य धोरणांची मोठी साथ होती, हे दुर्लक्षून चालणार नाही. आता यापुढील काळात धान्योत्पादन व उत्पादन क्षमता वाढविणे हेच आपल्यापुढील सर्वात मोठे आव्हान राहणार आहे.

आपले ६० टक्के सिंचन क्षेत्र पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. यंदा देशाच्या वेगवेगळ्या भागात उशीरा, अनियमित व अपुरी पर्जन्यवृष्टी झाली असून २००९-१० च्या खरीप हंगामाच्या उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे. दरम्यान, आंध्र प्रदेश व कर्नाटकास महापुरांचा फटका बसला असून, तेथील ५४ लाख हेक्टर क्षेत्रात तांदुळाची, साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रात कडधान्याची तर १६.५ लाख हेक्टर क्षेत्रात तेलबियांची लागवड योग्य प्रकारे होऊ शकलेली नाही. याखेरीज, अन्य काही राज्यांत पावसाच्या लहरीपणामुळे पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे गतवर्षाच्या तुलनेत यंदा तांदुळ व तेलबियांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटेल, असा प्राथमिक अंदाज आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान, आंध्र प्रदेश, झारखंड, बिहार, कर्नाटक व मध्यप्रदेश या राज्यांमध्ये खरीप पिकांचे सर्वाधिक नुकसान होईल असे दिसते.

शेतातील उभ्या पिकांच्या रक्षणासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. शेतकऱ्यांसाठी खास डिझेल सबसिडी जाहीर करण्यात आली, परंतु त्याचा लाभ फक्त बिहारनेच घेतला आहे. देशातील अनेक राज्यांना केंद्राच्या कोट्यातून अतिरिक्त वीज पुरविली गेली असून, बियाणांची उपलब्धता वाढावी म्हणून त्यासंबंधीचे निकष शिथिल करण्यात आले आहेत. खरीपाच्या उशीरा व रब्बीच्या लौकर पेरण्यांसाठी आवश्यक ती सर्व बियाणे देशभरात सर्वत्र पोचविण्याची व्यवस्था करण्यात आली असून तेलबिया, डाळी, तांदुळ, गहु व मका यांच्या बियाणावरील सबसिडी वाढविली आहे. जेणेकरून शेतकऱ्यांचा त्यावरील खर्च कमी होईल.

हे सर्व उपाय योजले असले तरी पहिल्या अग्रिम अंदाजानुसार, यावेळी तांदुळाचे उत्पादन १५ दशलक्ष टनांनी,

**“देशाच्या अन्नसुरक्षेचे ध्येय गाठण्यास सरकार वचनबद्ध असून, त्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जात आहेत. यंदा मोसमी पावसाने दगा दिल्यामुळे खरीपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, परंतु हे सर्व नुकसान रब्बी हंगामात भरून निघेल, असा आम्हाला विश्वास वाटतो. अर्थात यापुढील सर्वच काळात आपल्यापुढे सर्वात मोठे आव्हान राहाणार आहे ते धान्योत्पादन वाढीचेच. ते आपण पेलू शकलो तर देशाच्या अन्नसुरक्षेचे ध्येयही आपण निश्चितपणे गाठू शकू. शेतातील उभ्या पिकांच्या रक्षणासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. शेतकऱ्यांसाठी खास डिझेल सबसिडी जाहीर करण्यात आली, परंतु त्याचा लाभ फक्त बिहारनेच घेतला आहे. देशातील अनेक राज्यांना केंद्राच्या कोट्यातून अतिरिक्त वीज पुरविली गेली असून, बियाणांची उपलब्धता वाढावी म्हणून त्यासंबंधीचे निकष शिथिल करण्यात आले आहेत.”**




*नवी दिल्ली येथील शास्त्री भवनात ४ नोव्हेंबर, २००९ रोजी झालेल्या आर्थिक संपादकांच्या परिषदेत श्री. शरद पवार बोलत असून, शेजारी पीआयबीच्या प्रधान महासंचालिका नीलम कपूर, अन्न व नागरी पुरवठा सचिव राजीव अग्रवाल व इतर.*

कडधान्याचे ५.५ दशलक्ष टनांनी, तेलबियांचे २. दशलक्ष टनांनी व अन्य अन्नधान्याचे २१ दशलक्ष टनांनी घटले, असे दिसते. खरीपाच्या पिकांचे हे नुकसान आता रब्बी हंगामात भरून काढण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. मी व माझे सर्व अधिकारी राज्य सरकारांच्या सतत संपर्कात असून, बियाणे व खतांचा पुरवठा सर्वत्र पुरेशा प्रमाणात होईल, याची खबरदारी घेत आहोत. राज्यांचे कृषीमंत्री व कृषीसचीव यांच्याशी झालेल्या चर्चाप्रक्रियेमुळे आता सर्व राज्य सरकारे रब्बी हंगामाचे उत्पादन वाढविण्यास कटीबद्ध झाली असून, त्यासाठी ते पुढील उपाय योजणार आहेत.

■ गव्हाच्या पेरणी क्षेत्रात पाच लाख हेक्टरची वाढ त्यास उत्पादकता वाढीची जोड मिळाल्यामुळे गेल्या वर्षीपेक्षा गव्हाचे उत्पादन वीस लाख टनांनी वाढेल.

■ उन्हाळी तांदुळाच्या लागवड क्षेत्रात १२ ते १५ लाख हेक्टरने वाढ, पश्चिम बंगाल, ओरिसा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू व उत्तरप्रदेशचा पुर्वेकडील भाग येथील लागवडक्षेत्र वाढीमुळे तांदुळाचे उत्पादन दहा लाख टनांनी वाढेल.

■ उशीरा झालेल्या मोसमी पावसामुळे जमिनींची ओल वाढली आहे, त्याचा लाभ घेऊन डाळींच्या लागवड क्षेत्रात १५ लाख हेक्टरची वाढ, त्यामुळे किमान दहा लाख टन जादा उत्पादन होईल. तेलबियांच्या लागवड क्षेत्रातही १२ लाख हेक्टरची वाढ झाली आहे.

■ रब्बी मका व उन्हाळी बाजऱ्यामुळे एकूण धान्योत्पादन १५ लाख टनांनी वाढेल.

या सर्व उपायांमुळे रब्बी हंगामात एकूण धान्योत्पादन ८५ लाख टनांनी व तेलबियांचे उत्पादन १५ लाख टनांनी वाढेल अशी अपेक्षा आहे.

हा उत्पादनवेग वाढविण्यात 'गुंतवणुक' या घटकाचा फार मोठा वाटा राहील, कृषी व संलग्न क्षेत्रातील गुंतवणुक 'राष्ट्रीय कृषी विकास योजना' सारख्या कार्यक्रमांमुळे मोठ्या प्रमाणात वाढली असून गेल्या काही वर्षांत कृषी क्षेत्रातील एकूण भांडवलही वाढले आहे. गेल्या वर्षी राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी ३१६५ कोटी रुपयांची तरतुद केली होती, यंदा तो आकडा ४१०० कोटी रुपयांवर नेण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित मालाची आकर्षक किंमत मिळावी म्हणून अन्नधान्याच्या किमान हमी किंमती आम्ही सातत्याने वाढवित आहोत. २००४ साली गव्हाची किमान हमी किंमत ६३० रूपये क्विंटल होती, आता ती १०८० रुपयांवर नेण्यात आली आहे. तांदुळाची हमी किंमत ५६० रू. क्विंटल वरून ९५० रूपये क्विंटलवर गेली आहे तसेच खरीप हंगामासाठी तांदुळास ५० रू. प्रतिक्विंटल बोनसही जाहीर करण्यात आला आहे. किमान हमी किंमती वाढल्यामुळे प्रोत्साहित होऊन आमच्या शेतकऱ्यांनी गेल्या दोन वर्षात विक्रमी धान्योत्पादन करून दाखविले आहे.

अकराव्या पंचवार्षिक योजनेअखेर देशातील गहु-तांदुळ व डाळींचे उत्पादन अनुक्रमे १०, ८ व २ दशलक्ष टनांनी वाढविण्याच्या उद्देशाने २००७ साली 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान' सुरू करण्यात आले. या योजनेसाठीची आर्थिक तरतुद आता अकराशे कोटींवरून साडेतेराशे कोटींवर नेण्यात आली आहे.

मॅक्रो मॅनेजमेंट ऑफ ॲग्रिकल्चर स्कीमची फेररचना करण्यात आली असून अन्नसुरक्षा व जीवनमान सुधारण्याचे मुख्य उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने ही योजना सध्याच्या कृषीक्षेत्राशी सुसंगत बनविण्यात आली आहे. या योजनेत पीक उत्पादन व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनाशी संबंधित दहा उपाययोजनांचा अंतर्भाव आहे.

गेल्या काही काळात खाद्यतेलांचा दरडोई खप व आयात वाढली आहे. तेलबिया व डाळींचे उत्पादन वाढवून या वाढत्या मागणीची पूर्तता करण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून जी एकात्मिक योजना राबविली जात आहे त्यामुळे २००७-०८ मध्ये देशात तेलबियांचे २.७५ दशलक्ष टन एवढे विक्रमी उत्पादन झाले. २००८-०९ साली उत्पादनाचा हा आंकडा २८.१६ दशलक्ष टनांवर आला असला तरी २००९-१० मध्ये तो ३१.६० दशलक्ष टनांवर नेण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी बचत केलेल्या बियाणांचा दर्जा उंचावण्यासाठी 'सीड व्हीलेज प्रोग्रॅम' अंतर्गत आर्थिक सहाय्य देण्यात येते. आतापर्यंत या योजनेचा लाभ ६५ हजार खेड्यांनी घेतला असून, यावर्षी आणखी ६५ हजार खेड्यांना त्यात सामिल करून घेतले जाणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना जादा २.२० लाख क्विंटल सुधारित बियाणे उपलब्ध होईल.




*नॅशनल सीड कार्पोरेशनचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक श्री. एस. के. रुंगटा हे लाभांशाच्या रकमेचा धनादेश केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांच्याकडे सुपुर्द करीत असून शेजारी महामंडळाचे सदस्य जयसाहेब पुरंदरे व इतर मान्यवर.*





# ऊसाची आधारभूत किंमत टनाला १२९८ रु. ४० पै.

१ ऑक्टोबर २००९ पासून सर्व साखर कारखान्यांनी खरीदलेल्या ऊसासाठी प्रतिक्विंटल १२९.८४ रू. किंमत द्यावी, असे भारत सरकारने निश्चित केले आहे. ही किंमत साडेनऊ टक्के 'बेसिक रिकव्हरी रेट'शी संलग्न असून, त्यापेक्षा अधिक रिकव्हरी रेट असल्यास दर ०.१ टक्क्यास १.३७ रू. जादा दिले जातील.

यापूर्वी २५ जुन २००९ रोजी २००९-१० च्या साखर हंगामासाठी सरकारने प्रतिक्विंटल १०७.७६ रू. किंमत निश्चित केली होती. तो निर्णय आता नव्या आदेशामुळे रद्दबादल ठरला आहे.

- ऊस उत्पादक शेतकऱ्यास प्रतिक्विंटल १२९.८४ रू. किंमत मिळण्याची कायदेशीर हमी आहे. अर्थात योग्य वाटल्यास त्यापेक्षा अधिक किंमत देण्याची मुभा साखर कारखान्यांना राहील.
- १२९.८४ प्रति क्विंटल या किंमतीत ऊस वाहतुकीचा खर्च तसेच ऊस उत्पादन खर्चावरील सुमारे ४५ टक्के 'मार्जिन' समाविष्ट आहे. यासंदर्भात ऊस (नियंत्रण) आदेशात (१९६६) नमुद केलेले ५ (अ) कलम रद्दबादल ठरविण्यात आले आहे.
- नव्याने जाहीर करण्यात आलेली प्रतिक्विंटल १२९.८४ रू. ही किंमत २००८-०९ हंगामातील किंमतीपेक्षा ५१ टक्क्यांनी अधिक आहे.
- कोणत्याही राज्य सरकारने वा अन्य कोणत्याही यंत्रणेने त्यापेक्षा अधिक किंमत निश्चित केली तर फरकाची रक्कम संबंधित सरकार वा यंत्रणेकडून शेतकरी वा ऊस उत्पादक सहकारी संस्थांकडे थेट पाठविली जाईल. हा नियम संबंधित राज्यातील साखर कारखान्यांकडून खरीदल्या जाणाऱ्या सर्व ऊसास लागू राहील.
- नव्याने जाहीर करण्यात आलेल्या वाजवी व आकर्षक किंमतीमुळे सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक चांगल्या किमान किंमतीची हमी मिळणार आहे.

आपल्या देशास बियाणे उत्पादन व निर्यातीचे मुख्य केंद्र बनविण्यासाठी आम्ही बियाणे आयात-निर्याती संबंधातील नियम-निर्बंध शिथिल केले आहेत. आपल्याला सीड टेस्टिंग लॅबोरेटरीजना 'इंटरनॅशनल सीड टेस्टिंग असोसिएशन' ची मान्यता मिळविण्यासाठी आता सर्व राज्यांना विशेष प्रोत्साहन दिले जात आहे.

कृषी उत्पादनांच्या बाजारपेठांची सुधारणा करण्यास सरकार सर्वाधिक महत्व देत आहे. दर्जा व संख्या व या दोन्ही दृष्ट्या आपल्या बाजारपेठा खुप मागासलेल्या आहेत. हे चित्र बदलण्यासाठी सर्वत्र शीतगृहे व उत्तम दर्जाची गोदामे उभारली जाणे गरजेचे असून, त्यात पुढाकार घेणाऱ्या खासगी व्यक्ती व संस्थांना शंभर टक्के घसारा देण्यात येणार आहे. याखेरीज, टर्मिनल मार्केटस् स्किमची सुरूवातही करण्यात आली असून, त्याअंतर्गत आधुनिक टर्मिनल मार्केटस् उभारण्यासाठी पन्नास कोटी रुपये अनुदान दिले जाणार आहे. दरम्यान, ग्रामीण भागातील गोदामांसाठी २५ टक्के सबसिडी देणारी आमची योजनाही सुरू आहे.

कृषी पतपुरवठा वेळेवर होणे ही भारतातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने फार महत्वाची गोष्ट आहे, असे मला वाटते. ही पतपुरवठ्याची रक्कम आता आम्ही २००५-०६ मधील १८०४५० कोटी रुपयांवरून २८७१४९ कोटी रुपयांपर्यंत वाढविली आहे. या वर्षी पीक कर्जांसाठी सव्वा तीन लाख कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले असून, अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजात २ टक्के सुट दिली जाणार आहे. त्याखेरीज वेळेवर कर्जफेड करणाऱ्यांना आणखी एक टक्का सुट दिली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अल्प मुदतीच्या कर्जांचा व्याजदर प्रत्यक्षात ६ टक्केच राहील. सध्या सर्व राज्यांमध्ये 'किसान क्रेडिट कार्डस्' वितरीत केली जात असून, जुलै २००९ पर्यंत ८.३३ कोटी कार्डांचे वाटप झाले आहे. या कार्डांमुळे शेतकऱ्यांना बँकांकडून सुलभतेने कर्जे मिळू शकतील.



२००८-०९ वर्षात देशातील अन्नधान्याच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या, अर्थात महागाई झाली असली तरी सर्वसाधारणतः सर्व जीवनावश्यक वस्तुंची उपलब्धता समाधानकारक राहिली आहे. वाढती महागाई ही मात्र चिंतेची बाब असून, ती रोखण्यासाठी भारत सरकारतर्फे अनेक पावले उचलली जात आहेत. सध्या तरी, सर्वसामान्य नागरिकांना महागाईची झळ कमीतकमी बसावी म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरेसे धान्य उपलब्ध करून देण्यास आम्ही सर्वाधिक प्राधान्य देत आहेत. त्यासाठी सरकारी पातळीवर मोठ्या प्रमाणावर धान्यखरेदी केली जात आहे. २००८-०९ साली आम्ही २२६.८९ लाख टन तर २००९-१० साली २५३.८१ लाख टन गव्हाची खरेदी केली. या विक्रमी खरेदीमुळे सरकारी गोदामांमध्ये सध्या (१ ऑक्टोबर २००९) २८४.५७ लाख टन गहु आहे. तांदुळाच्या बाबतीतही हेच चित्र दिसते. २००७-०८ साली २८४.९३ लाख टन व २००८-०९ साली ३३३.०७ लाख टन तांदुळ खरेदी झाली असून हा आकडा २६० लाख टन एवढा तरी राहील, अशी अपेक्षा आहे. गेल्या २९ ऑक्टोबरला एकूण ७५.३१ लाख टन तांदुळाची खरेदी झाली होती. या २९ ऑक्टोबरला तो आंकडा ७६.९९ लाख एवढा होता. सध्या केंद्रीय साठ्यात १५३.४९ लाख टन तांदुळ आहे, त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेची मागणी आम्ही निश्चितपणे पूर्ण करू शकू.

जीवनावश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात व चलनवाढीस आळा बसावा म्हणून सरकारने अनेक पावले टाकली आहेत. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो. 'ओपन मार्केट सेल स्किम' अंतर्गत अनेक राज्यांना १० लाख टन गहु व ५ लाख टन तांदुळ देण्यात येईल. हे धान्य राज्य सरकारांना किमान हमी किंमत अधिक वाहतुक खर्च या दराने देण्यात येईल.

■ गहु-तांदुळ-डाळी-खाद्यतेले-साखर-मका व रिफाइंड



तेलावरील आयात करात कपात / संपूर्ण माफी

■ कच्च्या / पांढऱ्या / रिफाइंड साखरेच्या आयातीवर शून्य टक्के कर आकारणी. या आयातीस लेव्हीचे बंधन नाही.

■ खाद्यतेले व डाळींच्या निर्यातीस बंदी

■ साड्यावर निर्बंध जारी

■ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना सवलतीच्या (१५ रुपये किलो) दराने दहा लाख टन आयात खाद्यतेलाचे वितरण

■ शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ऊसाच्या किंमती न्याय्य व आकर्षक (फेअर अँड रिम्युनरेटीव प्राइस) ठेवण्याची तरतुद, स्वतःच्या वेगळ्या किंमती (स्टेट अॅडव्हाइस्ड प्राइस) न ठेवण्याच्या राज्य सरकारांना सुचना. या दोन किंमतीतील फरकाचा आर्थिक भार राज्यांना उचलावा लागेल.

■ सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांना डाळी आयात करून विकण्यास परवानगी दिली आहे. या व्यवहारात त्यांना जो काही तोटा होईल, त्याची भरपाई सरकार करणार.

■ सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विक्रीसाठी राज्य सरकारांना दहा रूपये किलो दराने आयात डाळींचा पुरवठा

■ लेव्ही साखरेचे प्रमाण दहावरून वीस टक्क्यांवर बिगर लेव्ही साखरेचा पुरेशा प्रमाणात पुरवठा

■ काही जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीत वायदे बाजारास बंदी

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतर्फे २००७-०८ साली ३३३ लाख टन धान्य उचलले गेले होते. गेल्या वर्षी तो आकडा वाढून ३४६ लाख टनांवर गेला. राज्यांना अतिरिक्त धान्य पुरवून 'अन्न सुरक्षेची निश्चिती केली आहे.

शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यात पशुधन, डेअरी उद्योग व मच्छीमारी क्षेत्र महत्वाची भुमिका बजावतेच परंतु त्यामुळे ग्रामीण भागातील भूमीहीन मजूर, छोटे शेतकरी व महिलांना रोजगारही मिळतो. दुष्काळादी नैसर्गिक आपत्तींच्या काळात हे पशुधनच शेतकऱ्यांचा सर्वोत्तम आधार ठरते. त्याची जाणीव ठेवून अकराव्या पंचवार्षिक योजनेत या क्षेत्राची एकूण प्रगती ६ ते ७ टक्के करण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे. त्यात दूधउत्पादन क्षेत्राची प्रगती ५ टक्के तर मांस व पोल्ट्री उद्योगाची प्रगती १० टक्के दराने होण अपेक्षित आहे. २००८-०९ मध्ये आपल्या दूधउत्पादनाने११० दशलक्ष टनांचा पल्ला गाठला असून, २०२१-२२ मध्ये हा आकडा १८० दशलक्ष टनांवर नेण्याचा आपला संकल्प आहे. त्यादृष्टीने 'नॅशनल डेअरी प्लॅन' ची आखणी करण्यात येत आहे.

■ अंडी व मत्स्योत्पादनात आपल्या देशाचा नंबर जगात तिसरा लागतो. २००८-०९ साली आपल्याकडे ७.१३ दशलक्ष टन एवढे मत्स्योत्पादन झाले.

■ आता देशातील मच्छीमारांना 'बायोमेट्रिक' ओळखपत्रे देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून, ते काम भरत इलेक्ट्रॉनिक्स लि. कडे सोपविण्यात आले आहे.

■ दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना चारा टंचाई भासू नये म्हणून राज्य सरकारांकडे जादा २.५२ लाख 'फॉडर मिनीकिटस्' पाठविण्यात आली आहेत. ही किटस् शेतकऱ्यांना मोफत दिली जातात.

कृषी व संलग्न क्षेत्रांच्या प्रगतीत कृषीसंशोधन व शिक्षणाने फार महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गेल्या काही वर्षांत आपण हायब्रिड पिकांच्या ९६ वेगवेगळ्या जाती तयार करण्यात यश मिळविले असून, सुमारे दहा हजार टन संकरित बियाणांचे उत्पादन केले आहे. नारळ, बटाटे, द्राक्षे आदि पिकांना त्याचा लाभ मिळाला असून पहिल्या 'क्लोन' म्हसराची (फर्स्ट क्लोनड् बफेलो काफ) निपज करण्याचे श्रेयही आपल्या नावावर जमा झाले आहे.

क्षारयुक्त, दलदलीच्या जमिनी सुधारण्यासाठी 'डेअर'ने अल्पखर्ची पण प्रभावी तंत्रज्ञाने विकसित केली आहेत. दरम्यान हवामान बदलांचा कृषीक्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी सरकारने नुकतीच 'नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ अबायोटिक स्ट्रेस मॅनेजमेंटची' स्थापना केली आहे.

२००८-०९ सालात आठ नव्या कृषी विज्ञान केंद्रांची उभारणी झाली असून, कृषी विकास केंद्राचे, ई लिंकिंग, पाणी व माती परीक्षण प्रयोगशाळा आणि पावसाच्या पाण्याचे संधारण आदि कामांसाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

कृषी विद्यापीठांचे जाळे अधिक मजबुत व्हावे आणि त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढावा म्हणून 'डेअरी' ने एक सर्वंकष 'अॅक्रिडेशन सिस्टीम' उभारली असून, मुलांची कल्पकता व उद्यमशीलता यांना वाव देण्यासाठी अनेक नवे शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय 'फेलोशिप्स' ची तरतुदही केली आहे. आमचे ध्येय आहे ते देशाच्या 'अन्नसुरक्षेच्या निश्चितीचे ! त्यासाठी शेतकरी वर्गास सर्व प्रकारच्या सवलती व सुविधा उपलब्ध करून देण्यास आम्ही प्रयत्नशील आहोत. आमचे हे प्रयत्न शेतकऱ्यांचे वैयक्तिक उत्पन्न वाढविण्यास तर सहाय्यक ठरतीलच परंतु त्यांना अधिक उत्पादन करण्याची प्रेरणाही देतील, हे निश्चित.

■■■

# जीवनावश्यक वस्तुंची महागाई रोखण्यास सरकार प्रयत्नशील



२००८-०९ या वर्षात एकूण चलनवाढ तर झालीच पण अन्नधान्याच्या किंमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या. अर्थात पुढे उद्योग क्षेत्रातील मंदीमुळे नोव्हेंबर २००८ पासून चलनवाढीचा वेग मंदावला आणि मग डाळी, खाद्यतेले व तांदुळ वगळता बहुतेक सर्व जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती स्थिर राहिल्या आणि त्यांची उपलब्धताही समाधानकारक राहिली. घाऊक किंमत निर्देशांकाचा विचार केला तर २००८-०९ सालात चलनवाढीचा वार्षिक दर १.१८ टक्क्यांनी घटला, जुन २००९ पासून त्यात किंचीत वाढ होत असून, त्यास मुख्यतः कडधान्ये, डाळी व कांदे-बटाट्यांसारख्या काही जीवनावश्यक वस्तुंच्या वाढत्या किंमती जबाबदारी आहेत. त्यामुळे एकुणच अन्नधान्याची महागाई ही आता सर्वांच्याच दृष्टीने चिंतेची बाब बनली आहे.

काही निवडक जीवनावश्यक वस्तुंच्या घाऊक किंमत निर्देशांक वाढीचा गेल्या वर्षभरातील तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| वस्तु | चलनवाढीचा वार्षिक दर ३-१०-०९ | वर्षभरापूर्वीचा चलनवाढ दर ४-१०-०८ |
|---|---|---|
| दुध | १०.०३ | ७.९ |
| साखर | ४५.५२ | १३.५८ |
| तांदुळ | १४.४७ | ७.५८ |
| गहु | ४.४६ | ७.०४ |
| वनस्पती | ० | ९.९७ |
| मोहरी व जवसाचे तेल | -१२.८४ | २५.६७ |
| बटाटे | ७८.२७ | १७.१२ |
| आटा | .७९ | ३.०१ |
| मका | १९.८२ | ९.३५ |
| भुईमुगाचे तेल | -३.९८ | -४.०८ |
| चहा | २.३३ | ७०.५४ |
| मुग | २६.९५ | १८.०६ |
| उडीद | २१.२४ | -२.३१ |
| कांदे | ९.२३ | -३९.७२ |
| मसुर | १६.०९ | २१.१२ |
| मीठ | -२.३५ | २६.७५ |



साखर, तांदुळ, डाळी व कांदे-बटाटे वगळता बाकी बहुतेक सर्व जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती चालु वर्षी आटोक्यात राहिल्या आहेत. अर्थात सध्या होत असलेल्या महागाईस वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वत्र वस्तुंची वाढलेली मागणी-सर्वसामान्य नागरिकांच्या उत्पन्नात झालेली वाढ- उपभोगाच्या एकूण पद्धतीत झालेला बदल - हवामानातील प्रतिकूल बदल, खनिज तेलांच्या किंमतीत झालेली वाढ, वाहतुक दरातील वाढ आणि सर्व कृषीउत्पादनांच्या किमान हमी किंमतीत करण्यात आलेली वाड असे अनेक घटक जबाबदारी आहेत.

२००८-०९ सालात डाळींचे देशांतर्गत उत्पादन (सुमारे दहा लाख टनांनी घटले आहे. गेल्या वर्षी ते १४.७६ दशलक्ष टन झाले होते, यंदा ते १४.६६ लाख टनच होईल असा अंदाज आहे. एकीकडे ही उत्पादन घट होत असतांना दुसरीकडे मागणी मात्र वाढती असल्यामुळे डाळींच्या किंमती वाढणे अपरिहार्य आहे. त्या आटोक्यात राखण्यासाठी सरकारने आयातीचा मार्ग चोखाळला असून या वर्षी २.४३ दशलक्ष टन एवढी आयात केली गेली आहे.

ऊसाचे लागवडक्षेत्र व उत्पादकता घटल्यामुळे तसेच अधिक किमान हमी किंमत मिळू लागल्याने शेतकरी ऊसाऐवजी गव्हाच्या पेरणीस प्राधान्य देऊ लागल्यामुळे यंदा साखरेच्या टंचाई व महागाईचे चक्र वेगाने फिरू लागले आहे. यावर्षी साखर कारखान्यांचा गळित हंगाम नेहमीच्या २१० दिवसांवरून १५० दिवसांवर आल्यामुळे तसेच बराचसा ऊस साखरेऐवजी गुळाच्या उत्पादनाकडे वळविला गेल्यामुळे आता देशांतर्गत साखर उत्पादन जेमतेम १५० लाख टन होईल, अशी अपेक्षा आहे. यंदा बिहार, मध्यप्रदेश व पश्चिम बंगालमधील बटाट्याच्या पिकास तीव्र पाणीटंचाईची फटका बसला असून, चालू खरीप हंगामात त्याचे एकूण उत्पादन किमान दोन लाख टनांनी घटले, असा अंदाज आहे. कांद्याचे उत्पादन एकंदर मागणीच्या तुलनेत समाधानकारक होते परंतु आंध्र प्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटक या तीन राज्यांना नुकताच अतिवृष्टीचा फटका बसला आणि कांद्याच्या पिकाची जबर हानी झाली. साहजिकच सध्या कांदा महागला आहे, परंतु खरीपाचे पीक हाती आले की परिस्थिती निश्चितपणे बदलेल. देशातील किंमत स्थितीचा आढावा 'कॅबिनेट कमिटी ऑन प्राइसेस' व 'कमिटी ऑफ सेक्रेटरीज' तर्फे वेळोवेळी घेतला जातो.



यंदा सरकारने ५८.५३ दशलक्ष टन धान्याची (३३.३० दशलक्ष टन तांदुळ व २५.२३ दशलक्ष टन गहु) खरेदी केली असून, किमान 'बफर स्टॉक' ची निश्चिती केल्यानंतरही सरकारकडे भावपातळी स्थिर राखण्यासाठी पुरेसे धान्य राहील. आता नेहमीच्या 'बफर स्टॉक' खेरीज ५० लाख टन गहु व तांदुळाच्या विशेष राखीव साठाही ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. दरम्यान, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व अंत्योदय अन्न योजनेचे लाभधारक यांना पूर्वीप्रमाणे अनुक्रमे ५ रू. ६५ पैसे व ३ रूपये किलो दराने गहु आणि ४.१५ पैसे व २ रूपये किलो दराने तांदुळ उपलब्ध करून दिला जात आहे.

गहु, तांदुळ, डाळी, साखर, खाद्यतेले व मका या वस्तुंच्या आयातीवरील अनेक निर्बंध रद्द करण्यात आले असून, आयातशुल्कही निम्म्यावर आणले गेले आहे वा पूर्णतया माफ करण्यात आले आहे. काबुली चणा वगळता सर्व डाळी व खाद्यतेलांच्या निर्यातीस बंदी घालण्यात आली आहे.

■■■




# कृषी विज्ञान केंद्रे : मूलभूत ज्ञानाचे स्रोत बनावेत

## - शरद पवार

*कोईमतुर येथील तमिळनाडू ॲग्रिकल्चरल युनिव्हर्सिटीत ६ नोव्हेंबर ०९ रोजी कृषी विज्ञान केंद्राची चौथी राष्ट्रीय परिषद झाली. तिचे उद्घाटन करताना केंद्रिय कृषीमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केलेले विचार.*

तमिळनाडूचे आदरणीय मुख्यमंत्री डॉ. एम. करुणानिधी, राज्याचे कृषीमंत्री व्ही. अरूमुगम, डीएआरई चे सचिव व आयसीएआरचे महासंचालक डॉ. मंगला राय, तमिळनाडू कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भूपती, आपल्या देशाच्या विविध भागांचे सन्मान्य प्रतिनिधी आणि अन्य सर्व उपस्थित प्रतिष्ठित,

आज तुम्हा सर्वांसमवेत या राष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहतांना मला अतिशय आनंद होत आहे. देशभरातील ५६९ कृषी विज्ञान केंद्रांचे प्रतिनिधी आपले अनुभव सांगण्यासाठी आणि जिल्हास्तरावर कृषी तंत्रज्ञानाचे अभ्यासकेंद्र म्हणून नेमके काय करावे याचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन मिळविण्यासाठी येथे आलेले आहेत.

भाषणाच्या प्रारंभी मी इरोदी (तमिळनाडू), सतना (मध्यप्रदेश) व उत्तर गोवा येथील कृषी विज्ञान केंद्रांचे अभिनंदन करू इच्छितो. त्यांनी देशातील सर्वोत्तम केंद्रे ठरण्याचा व २००८-०९ चे राष्ट्रीय पुरस्कार पटकावण्याचा बहुमान मिळविला आहे. यापुढील काळातही ते असेच उत्तम काम करीत राहातील अशी मला खात्री वाटते.


तमिळनाडू कृषी विद्यापीठाची इमारत

आज या व्यासपीठावर देशातील एक सर्वात ज्येष्ठ नेते डॉ. करूणानिधीजी उपस्थित आहेत. आपल्या अथक प्रयत्नांच्या बळावर त्यांनी तमिळनाडूस देशातील एक सर्वात समृद्ध कृषक राज्य बनविले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली या राज्याने ऊस व नारळ यासारख्या पिकांची सर्वाधिक उत्पादनक्षमता प्राप्त केली असून, येथील भात, मका, भुईमुग व ब्लॅक ग्राम सारख्या अन्य पिकांची उत्पादकताही सरासरी राष्ट्रीय उत्पादकतेपेक्षा अधिक आहे. त्याबद्दल तमिळनाडूतील मेहेनती शेतकरीवर्ग आणि श्री करुणानिधीजी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो.

गेल्या चार दशकात भारतीय कृषीक्षेत्राने असाधारण प्रगती केली आहे. सर्व प्रकारचे अन्नधान्य, फळे, भाजीपाला, दुध, अंडी व मासे यांच्या उत्पादनात आता अनेक पट वाढ झाली असून, देशाची लोकसंख्या वाढत असतांनाही आपण दरडोई अन्न उपलब्धतेचे प्रमाण वाढविण्यात यश मिळविले आहे. अर्थात एकूण

“

**कृषी क्षेत्र आता अधिकाधिक आव्हानक व बाजारपेठाधारित बनत चालले आहे. त्यात टिकून राहायचे तर आपल्या शेतकऱ्याचे एकूण ज्ञान व कौशल्य वाढले पाहिजे. नेमकी त्यासाठीच देशात सर्वदूर कृषी विज्ञान केंद्रांची उभारणी करण्यात आली असून, यापुढील काळात ही केंद्रे मुलभूत स्त्रोत व ज्ञानकेंद्रे बनली पाहिजेत. या वर्षीच्या खरीप हंगामात कृषी विज्ञान केंद्रांतर्फे शेतकरी व अन्य संबंधितांना हवामानावर आधारित कृषी सल्ल्याचे संदेश दररोज पाठविले गेले. आता रब्बी हंगामातही त्यांनी अधिक उत्पादन देणाऱ्या विविध जातीच्या बियाणांची माहिती तसेच हे बियाणे वेळेत उपलब्ध होण्यासंबंधातील व्यवस्था याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. ते करतांना त्यांचा भर उपलब्ध पाण्याचा वापर सिंचनासाठी नेमकेपणाने व पूर्ण कार्यक्षमतेने होऊन पीक उत्पादनास अधिक चालना मिळेल यावर लक्ष केंद्रीत करणे जरुरीचे आहे.**

”



देशांतर्गत उत्पादन व रोजगारसंधीत मात्र कृषी क्षेत्राचा वाटा १९५१ ते २००८ या काळात अनुक्रमे ५१ व ७२ टक्क्यांवरून १८ व ५२ टक्क्यांवर आला आहे. आज प्रगत देशांमध्ये शेतीवर उपजिविका करणारे नागरिक व शेतजमीन यांचे परस्परप्रमाण दरडोई ११ हेक्टर इतके असतांना आपल्याकडे मात्र ते जेमतेम दरडोई ०.३ हेक्टर एवढे पडते. याचा सरळ अर्थ असा की आपले नैसर्गिक साधनसंपत्तीचे स्त्रोत घटत चालले असून, उद्योग, शहरी व बिगर कृषी क्षेत्रांसाठी उपलब्ध जमिनीचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे.

अन्न सुरक्षा हा आपल्यापुढील एक महत्वाचा प्रश्न आहे. गेल्या तीन दशकांत (१९७२ ते २००७) भारताची लोकसंख्या ५५१ दशलक्षांवरून ११२२ दशलक्षांवर गेली आहे. म्हणजेच सध्या आपल्या देशाला दुप्पट लोकसंख्येचे भरण-पोषण करावे लागत आहे. अर्थात बहुतेक सर्व अन्नधान्याचे उत्पादनही दुपटीने वाढल्यामुळेच आपल्याला ते शक्य होत आहे. ही उत्पादनवाढ फळबागायत, अंडी-मासे दुधदुभत्याच्या बाबतीत विशेषत्वाने झाल्यामुळे अन्नसुरक्षेच्या पोषणमुल्यातही सुधारणा झाली आहे. अर्थात आजही बहुतेक सर्व अन्नधान्याचा दरडोई खप आजही आवश्यकतेपेक्षा कमी असून, त्यामुळे देशाची सुमारे एक पंचमांश लोकसंख्या कुपोषित आहे.

धान्योत्पादनाच्या दृष्टीने गेले वर्ष विक्रमी ठरले. तेव्हा २३४ दशलक्ष टनांचा पल्ला गाठून आपण सर्वोत्तम कामगिरी बजावली असली तरी २०२०-२१ मध्ये आपल्याला २८१ दशलक्ष टन धान्याची गरज भासणार आहे. धान्याप्रमाणे दुध-भाजीपाला, फळे व साखरेची मागणीही वाढत असून, ती पूर्ण करण्यासाठी आपल्याला एकजुटीने प्रयत्न करावे लागणार आहेत.

प्रादेशिक विषमता ही आपल्यादृष्टीने आणखी एक चिंतेची बाब आहे. ती दूर करण्यासाठी सुधारित तंत्रज्ञानांचा अंगिकार व विकसित बाजारपेठांची उभारणी हाच पर्याय आहे.

जमिनीची धूप व जलस्त्रोतांची हानी यांचा कृषीउत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. सध्या जंगलतोड व जमिनीची धूप यामुळे 'कार्बनचे चक्र' बिनसत चालले असून जमिनीच्या रासायनिक, जैविक व जलतत्त्विक पर्यावरणाची हानी होत आहे. दरम्यान, हवामान बदलांचाही फटका कृषीउत्पादनास बसू लागला असून, या बदलामुळे साऱ्या जगाचेच निसर्गचक्र धोक्यात आले आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे अतिवृष्टी, महापूर व दुष्काळ अशा संकटांची मालिका जगाच्या विविध भागात सुरू झाली असून, यापुढील काळात त्यांची तीव्रता व व्याप्ती वाढण्याची शक्यता दिसते.

या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच आता आपण कृषीक्षेत्राच्या

विकासास सर्वाधिक प्राधान्य देत आहोत. या विकासप्रक्रियेस गती देण्यासाठी केंद्र सरकारने 'राष्ट्रीय कृषी विकास योजना' आखली असून, त्यासाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेत २५ हजार कोटी रुपयांची तरतुद केली आहे. दरम्यान, तांदुळ, गहु व डाळींचे उत्पादन अनुक्रमे १८.८ व २ दशलक्ष टनांनी वाढविण्यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान' सुरू करण्यात आले असून, त्यासाठी सुमारे पाच हजार कोटी रुपयांची तरतुद केली गेली आहे. या सर्व योजना व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अर्थातच देशभरातील संशोधक व अन्य तज्ज्ञांचे सहकार्य मिळणे गरजेचे आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात कृषीविकासाचा वेग चार टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट आपण निश्चित केले आहे. ते गाठण्यासाठी जलव्यवस्थापनात सुधारणा- जमिनीचा दर्जा टिकविण्यावर भर -पीकपद्धतीत वैविध्य- पशुधनाची पैदास- मच्छीमारी क्षेत्राचा विकास आणि बाजारपेठ यंत्रणात सुधारणा अशा अनेक गोष्टी कराव्या लागणार आहेत.

देशाच्या विविध भागात होणाऱ्या पीक उत्पादनात जो लक्षणीय फरक दिसतो, तो दूर करण्यासाठी उत्तम दर्जाचे सुधारित बी-बियाणे सर्व शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने आयसीएआरने हाती घेतलेला 'मेगा सीड प्रॉडक्ट'चा प्रकल्प महत्वपूर्ण मानावा लागेल. अर्थात त्याची व्याप्ती अधिक वाढण्याची आवश्यकता आहे.

कृषीक्षेत्र आता अधिक आव्हानाक व बाजारपेठाधारित बनले असून, त्यात टिकून राहायचे तर आमच्या शेतकऱ्यांचे एकूण ज्ञान व कौशल्य वाढणे जरूरीचे आहे. आपली कृषीविज्ञान केंद्रे नेमके तेच काम करीत असून, असंख्य प्रयोग, प्रात्यक्षिके व प्रशिक्षणाद्वारे शेतकरीवर्गाची जाण व क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. याखेरीज बियाणे-पेरणीची साधनसामुग्री, जैविक उत्पादने, जनावरांचा चारा आणि पोल्ट्री स्ट्रेन्स यांचा दर्जा उंचावण्यातही ही केंद्रे मोलाची भूमिका बजावत आहेत.

कृषी विज्ञान केंद्रांची ही यंत्रणा अधिक मजबुत व्हावी यासाठी आयसीएआर सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नांमुळेच नवव्या योजनेच्या काळात असलेली या केंद्रांची २७३ ही संख्या आता ५६९ वर गेली आहे. नव्याने आकारास आलेल्या २८ जिल्ह्यांमध्येही अशी केंद्रे उभारण्याची तरतुद अकराव्या योजनेत करण्यात आलेली आहे. त्याखेरीज, ५० मोठ्या जिल्ह्यांमध्ये एक जादा केंद्रही उभारले जाईल.

कृषी विज्ञान केंद्रांच्या उपक्रमांसाठी अर्थसंकल्पात वाढीव तरतुदी केल्या जात असून, त्याआधारे मानवी साधनसंपत्तीचा





विकास व तंत्रज्ञानिक प्रगतीस अधिकाधिक चालना दिली जात आहे. कृषी विद्यापीठांच्या मुख्य आवारात 'फार्मर्स होस्टेल' सारख्या सोयी उपलब्ध झाल्या असून, त्यामुळे शेतकऱ्यांना कृषी विज्ञान केंद्रांमधील प्रशिक्षणानंतर अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञानांची ओळख करून घेणे शक्य होत आहे.

दरम्यान, आयसीएआरने आपल्या सर्व आठ विभागीय समन्वय युनिटस्‌चे रुपांतर विभागीय प्रकल्प संचालनालयांमध्ये केले असून, त्याबद्दल मी महासंचालक डॉ. मंगला राय यांचे अभिनंदन करतो. शेतकरी वर्गाच्या प्रगतीसाठी झटणाऱ्या कृषी विज्ञान केंद्रांचे काम अधिक कार्यक्षमतेने होण्यास त्यांचा हा निर्णय सहाय्यक ठरणार आहे.

कृषी विज्ञान केंद्रांच्या पायाभूत सोयीसुविधा अधिक विकसित करण्यासाठी आणि तेथे माती व जल परीक्षण व रेनवॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर सारख्या नव्या यंत्रणा उभारण्यासाठी ३९१२.४ लाख रुपयांची जादा तरतुद करण्यात आली आहे. सध्या देशभरातील १९२ केंद्रे व आठ विभागीय प्रकल्प संचालनालयांमध्ये 'ई-कनेक्टिव्हीटी'ची सोय, करण्यात आली असून, त्यामुळे शेतकरी व अन्य संबंधितांपर्यंत आवश्यक ती सर्व माहिती विनाविलंब मिळू शकेल.

या वर्षीच्या खरीप हंगामात कृषी विज्ञान केंद्रांतर्फे शेतकरी व अन्य संबंधितांना हवामानावर आधारित कृषी सल्ल्याचे संदेश दररोज पाठविले गेले. आता रब्बी हंगामातही त्यांनी अधिक उत्पादन देणाऱ्या विविध जातीच्या बियाणांची माहिती तसेच हे बियाणे वेळेत उपलब्ध होण्यासंबंधातील व्यवस्था याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. ते करतांना त्यांना भर उपलब्ध पाण्याचा वापर सिंचनासाठी नेमकेपणाने व पूर्ण कार्यक्षमतेने होऊन पीक उत्पादनास अधिक चालना मिळेल यावर लक्ष केंद्रीत करणे जरुरीचे आहे.

यापुढील काळात कृषी विज्ञान केंद्रांनी 'स्रोत व ज्ञान केंद्रांची भूमिका बजावली पाहिजे तर कृषी विद्यापीठांनी त्यांना आवश्यक ते सर्व तंत्रज्ञान पुरविणाऱ्या संस्था बनले पाहिजे. तसे झाले तरच आपला शेतकरीवर्ग अधिक जाणकार व सबल होऊ शकेल.

या परिषदेत या सर्व विषयाचा तपशीलाने उहापोह होईल आणि कृषी विज्ञान केंद्रांचे जाळे अधिक मजबुत व कार्यक्षम होण्यास त्यामुळे हातभार लागेल अशी मला खात्री आहे.

■■■



# सेनेला 'राज'चे तर भाजपला 'जीनां'चे ग्रहण

- छगन भुजबळ

राज्याचे तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्रीपद स्वीकारलेले श्री. छगन भुजबळ यांची विधानसभा निवडणुकीसंबंधीचे विश्लेषण करणारी ही विशेष मुलाखत.

महाराष्ट्रातील सुजाण मतदारांनी तिसऱ्यांदा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीवर विश्वास व्यक्त करून स्पष्ट बहुमताने आघाडीच्या हाती पुन्हा सत्तेची सुत्रे दिली आहेत. या आघाडी सरकारचे उपमुख्यमंत्री म्हणून अत्यंत धडाडीने काम करणारे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मुलूखमैदान तोफ म्हणून ओळखले जाणारे श्री. छगन चंद्रकांत भुजबळ यांची पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची सुत्रे हाती घेतल्यानंतर गेल्या ५ वर्षांत त्यांनी कामाचा जो सपाटा लावला आणि बीओटी तत्त्वावरती प्रचंड मोठ्या प्रमाणावर कामे करून या विभागाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. इतकेच नव्हे तर नाशिक जिल्ह्यातील ज्या येवला विधानसभा मतदार संघातून ते २००४ साली आमदार म्हणून निवडून आले होते त्या येवला तालुक्याचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवून व कामांचा डोंगर उभा करून तालुक्याचे पूर्ण रूप पालटून टाकले होते. कामाचा त्यांचा हा वेग पाहून शेजारच्या चांदवड तालुक्याने तर श्री. भुजबळ यांना ''आम्ही आपल्याला बिनविरोध निवडून देतो तुम्ही आमच्या येथूनच उभे राहा आणि तुम्हाला शक्य नसेल तर आपले चिरंजीव पंकज भुजबळ यांना तरी येथून उभे करा'' असा आग्रह धरला होता. असाच आग्रह नांदगाव-मनमाड या मतदारसंघातील लोकांनी श्री. पंकज भुजबळ यांच्या उमेदवारीसाठी श्री. छगन भुजबळ यांच्याकडे धरला त्यामुळे जे नांदगाव किंवा मनमाड श्री. पंकज भुजबळ यांनी कधी पाहिले नव्हते तेथून त्यांना उभे रहावे लागले आणि निवडणुकीच्या आधी फक्त दहा दिवस ते तेथे गेले. कोणाचाही परिचय नसतांना व मतदारसंघाची काहिही माहिती नसताना श्री. छगन भुजबळ यांच्यावरील लोकांचे प्रचंड प्रेम व विश्वास यामुळे पंकज भुजबळ नांदगाव-मनमाडमधुन २१ हजाराच्या मताधिक्क्याने विजयी झाले. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठा मंत्री श्री. शरद पवार यांचे अत्यंत जवळचे व विश्वासू सहकारी म्हणून श्री. छगन भुजबळ ओळखले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उभारणीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा असून पक्षासाठी त्यांनी केलेला त्यागही तितकाच महत्वाचा

**"शिवसेनेतून बाहेर पडलेल्या आणि मनसेची स्थापना केलेल्या श्री. राज ठाकरे यांचे ग्रहण शिवसेनेला लागलेले आहे. भाजपला महंमद अली जीनांच्या ग्रहणानं छळलेले आहे. त्यामुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत हा पक्ष खिळखिळीत बनला आहे. आज भाजपमध्ये कुणीही प्रभावी नेता राहिलेला नाही. वय व प्रकृती यामुळे श्री. बाळासाहेब ठाकरे हे प्रत्यक्ष लढाईत येऊ शकत नसल्यामुळे निवडणुकीतील रान पेटविण्याचे काम प्रभावीपणे होऊ शकले नाही. शिवसेना नेत्यांचा आज सारा वेळ अंतर्गत कलह सोडविण्यात जातो आहे आणि सेनेवरती आता कोणाचीही पकड राहिलेली नाही. पूर्वी शिवसेनेत यायला दरवाजा आहे पण बाहेर जायला दरवाजा नाही असे सांगितले जायचे. आता शिवसेनेत सगळीकडे दरवाजेच-दरवाजे दिसतात. सध्या तर शिवसेनेत कोण कधी आला आणि कधी गेला हे कळतच नाही एवढी नेतृत्वाची पकड ढिली झाली आहे. सुटली आहे. ऐन निवडणूकीच्या वेळेला दोन भावांचे भांडण जुंपले कोण कोणाला साप म्हणतोय, उंदीर म्हणतोय या आरोप-प्रत्यारोपातच पुष्कळ वेळ जाऊन लोकांची भरपूर करमणूक झाली. आता खंजीरही बरेच निघाले आहेत. कोण कुणामध्ये खंजीर खुपसतो आहे याबाबतचा काहीही ताळमेळ राहिलेला नाही. खंजीरदेखील बोथट झाले आहेत."**



*राज्यपाल श्री. जमीर हे श्री. छगन भुजबळ यांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ देत असून, व्यासपीठावर शेजारी मुख्यमंत्री अशोक चव्हाण.*

व नजरेत भरावा असा विलक्षण मोठा आहे. त्यांची सेवाज्येष्ठता, अनुभव, त्याग, निर्भयता व ओबीसी समाजाचे ते प्रभावीपणे करीत असलेले नेतृत्व आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा महाराष्ट्रात प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्यांची पुन्हा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. अजित पवार यांना उपमुख्यमंत्रीपदासाठी बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा असतानाही श्री. शरद पवार यांनी जाणिवपूर्वक श्री. भुजबळ यांच्या हाती उपमुख्यमंत्रीपदाची सुत्रे देऊन श्री. अजित पवार यांना आणखीन थोडा काळ थांबण्याचा सल्ला दिला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे तिसऱ्यांदा उपमुख्यमंत्रीपद स्वीकारलेले श्री. छगन भुजबळ यांची विधानसभा निवडणुकीसंबंधीचे विश्लेषण करणारी ही विशेष मुलाखत.

**प्रश्न : विधानसभा निवडणुक निकालावरची आपली प्रतिक्रिया काय आहे ?**

भुजबळ : निवडणुकीचा निकाल पूर्ण अपेक्षेप्रमाणे आहे. अगोदरपासूनच मी सांगत होतो कुठल्याही परिस्थितीत सरकार काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचेच येईल पण लोकांना विश्वास वाटत नव्हता. सरकार बनविण्यासाठी जेवढे बहुमत लागते तेवढ्या जागा आम्हाला निश्चित मिळतील, कुणाच्याही मदतीची आम्हाला गरज पडणार नाही, १४५ पेक्षा अधिक जागा आघाडी निश्चित मिळवेल. आमचा हा आत्मविश्वास खरा ठरला आहे. कोणाच्याही मदतीशिवाय आम्ही सरकार बनवू शकलो आहोत.

**प्रश्न : हा आत्मविश्वास कशाच्या आधाराने आपण**



*राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुंबई मुख्यालयात झालेल्या बैठकीत विधीमंडळ नेता निवडीचा अधिकार श्री. शरद पवार यांना देण्यासंबंधीचा ठराव केल्यानंतर बैठकीतून बाहेर पडताना प्रफुल्ल पटेल, तारिक अन्वर, डी. पी. त्रिपाठी, छगन भुजबळ, आर. आर. पाटील, अजित पवार, सुनिल तटकरे, वसंत डावखरे व इतर मान्यवर आमदार.*

**व्यक्त करीत होता ?**

भुजबळ : मागील पाच वर्षांत आमच्या आघाडी सरकारने राज्यात विकासाचे प्रचंड काम केले आहे. शेती, सिंचन, वीज, सार्वजनिक बांधकाम, रस्ते, घरबांधणी, दारिद्य निर्मूलन, आदिवासी विकास, शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय सोयीसुविधा, इस्पितळांची उभारणी व नुतनीकरण, समाजमंदिरे, क्रिडांगणे व जिल्हा निहाय खेळाची संकुले, आदिवासी व मागासवर्गीयांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप व्हावे म्हणून अर्थसंकल्पात केलेली तरतुद, अल्पसंख्यांकांसाठी न्यायमूर्ती राजेंद्र सच्चर आयोगाच्या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी अर्थसंकल्पात केलेली शंभर कोटींची तरतुद, पुणे,मुंबई, नागपुर, ठाणे, औरंगाबाद, अमरावती, कोल्हापूर, यासारख्या शहरांसाठी जेनयुआरएम व युएसएसआयडीएमटी यासारख्या केंद्रसरकारच्या योजनेतून मिळविलेला भरीव निधी यामुळे राज्यात आघाडी सरकारला विकासकामांचा प्रचंड डोंगर उभा करता आला. ही विकासकामेच मतदारांना समाधान देतील आणि या कामांच्या आधारावर ते आम्हाला मतदान करतील. ही विकासकामे हाच आमचा विजयाच्या आत्मविश्वासाचा पाया होता.

**प्रश्न : केंद्रसरकारने केलेल्या मदतीचा व कामांचा आपल्याला या निवडणुकीत किती फायदा झाला?**

भुजबळ : केंद्रात पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकार पुन्हा सत्तेत आले. युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय कृषी व अन्न नागरी पुरवठा मंत्री



*श्री. छगन भुजबळ यांना पेढा भरविताना श्री. अशोक चव्हाण*

श्री. शरद पवार, केंद्रीय विमान वाहतुक मंत्री श्री. प्रफुल पटेल व युवा नेते राहुल गांधी आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी गेल्या पाच वर्षात देशभर व महाराष्ट्रात ज्या अनेक निरनिराळ्या योजना राबवून कोट्यावधींचा निधी महाराष्ट्राला उपलब्ध करून दिला त्याचा फार मोठा फायदा या निवडणुकीत आम्हाला झाला आहे. केंद्रात ज्या विचाराचे सरकार आहे त्याच विचाराचे सरकार आपण महाराष्ट्रात आणले तर आपल्याला केंद्राकडून मोठ्या प्रमाणावर, भरघोस व सढळ हाताने निधी मिळतो हे चित्र जनतेने पाहिले होते. त्याचा अनुभव घेतला होता. म्हणून मतदारांनी तिसऱ्यांदा आघाडी सरकारच्या गळ्यात विजयाची माळ घातली आहे.

विशेषत्वाने उल्लेख करावयाचा झाल्यास श्री. शरद पवार यांच्या पुढाकारामुळे केंद्र सरकारने जी ७१ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली त्याचा फायदा महाराष्ट्रातील जवळपास ४५ लाख शेतकऱ्यांना झाला होता. याशिवाय पीककर्जाचा कमी केलेला व्याजदर, शेतीसाठी वाढवून दिलेली कर्जाची रक्कम, महाराष्ट्राच्या धर्तीवर देशभर लागू केलेली रोजगार हमी योजना व तिच्यामार्फत किमान १०० दिवस तरी रोजगार देण्याची दिलेली हमी, नॅशनल हॉर्टिकल्चरल मिशन व नॅशनल हॉर्टिकल्चरल बोर्डामार्फत फळबागा, ग्रीन हाऊस, जलसंधारण, शेतीमाल निर्यात व साठवणुकीसाठी अनुदान, रायपनिंग चेंबर्स, वातानुकुलीत शीतगृहे, कोल्डचेन व प्रक्रिया उद्योगांची उभारणी करण्यासाठी दिलेले प्रोत्साहन या सर्व योजनांचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत आम्ही पोहचवू शकलो त्यामुळेही मतदारांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण होते. केलेले विकासकाम मतदानाच्या रुपाने 'कॅश' करण्यात आम्ही यशस्वी झालो.

मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर यासारख्या शहरांना केंद्र सरकारने जवाहरलाल नेहरू पुर्ननिर्माण योजनेमधून पहिल्यांदा मोठ्या प्रमाणावर अनुदानाच्या रुपाने कोट्यावधी रुपये दिल्यामुळे इथले बरेच काळ रेंगाळलेले व वाढती लोकसंख्या व रोजगारासाठी बाहेरून येणाऱ्यांमुळे शहरातील मुलभूत व पायाभूत सोयीसुविधांवर पडत असलेला ताण यामुळे गुंतागुंतीचे व बिकट बनलेले प्रश्न सोडविण्यास मदत झाली आहे. प्रामुख्याने पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, भुयारी गटारी योजना,



*उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर राष्ट्रवादी भवनात प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन छगन भुजबळ यांचे अभिनंदन केले. यावेळी शेजारी प्रफुल्ल पटेल, गोविंदराव आदिक व इतर मान्यवर.*




*उपमुख्यमंत्री निवडण्यासाठी राष्ट्रवादी भवनात झालेल्या बैठकीला उपस्थित असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे मान्यवर नेते सर्वश्री प्रफुल्ल पटेल, तारिक अन्वर, डी. पी. त्रिपाठी, आर. आर. पाटील, छगन भुजबळ, अजित पवार, बाबासाहेब कुपेकर, दिलीप वळसे-पाटील, अरुण गुजराथी, मधुकर पिचड, विजयसिंह मोहिते-पाटील व जयंत पाटील.*

मेट्रो रेल्वे, रस्ता रुंदीकरण, झोपडपट्ट्यांचे निर्मूलन व झोपडपट्टीवासियांना पक्की निवासी घरे यासारखे प्रश्न प्राधान्याने हाती घेण्यात आले आहेत. प्रभावी पद्धतीने यातील काही कामे आम्ही पूर्ण केली असून काही कामांची उभारणी चालू आहे. ती पूर्णत्वाला जायची असेल तर निधी मिळणे आवश्यक आहे आणि तो केंद्राकडूनच मिळू शकतो याबाबत जनतेची खात्री पटल्यामुळे ते या निवडणुकीत आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.

**प्रश्न : या विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाकडून कोणत्या चुका झाल्या आणि पक्ष कुठे कमी पडला?**

भुजबळ : लोकसभा निवडणुकीच्या वेळी आमच्याकडून ज्या चुका झाल्या होत्या त्यांची पुनरावृत्ती होणार नाही यांची सुरुवातीपासूनच आम्ही सारेजण काळजी घेत होतो. आमचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार हे प्रथमपासूनच म्हणजे अगदी उमेदवारी तिकीटे निश्चित करण्यापासून मतदान होईपर्यंत प्रत्येक गोष्टीत बारकाईने लक्ष घालीत होते. आम्हाला वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन करीत होते. कुठे उणिव राहिली असेल तर ती लगेच निदर्शनास आणून देऊन तात्काळ करावयाची उपाययोजनाही सुचवित होते. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत प्रचाराच्या कामात व मतदारांपर्यंत पोहोचण्यात आम्ही कुठेही कमी पडलो नाही. काँग्रेस पक्षाने या निवडणुकीत आम्हाला अपेक्षेपेक्षा १० जागा कमी दिल्या होत्या. आम्ही निम्म्या म्हणजे १२४ जागा मागत होतो. प्रत्यक्षात आम्हाला ११४ च जागा मिळाल्या. त्यातील ११२ जागांवर आम्ही अधिकृतपणे राष्ट्रवादीच्या घड्याळ या निशाणीवरती उमेदवार उभे करू शकलो. दोन जागांवर काही कारणांनी अधिकृतपणे उमेदवार उभे करता न आल्यामुळे ऐन वेळी अपक्षांना पाठिंबा द्यावा लागला. निवडणूक लढवलेल्या ११२ जागांपैकी ६२ जागांवर आमचे उमेदवार विजयी झाले. विजयाचे हे प्रमाण ५५ टक्के आहे. काँग्रेस पक्षाने १७४ जागा त्यांच्याकडे घेतल्या होत्या. त्यातील दोन जागा त्यांनी गवई गटाला सोडल्या. १७२ जागी त्यांनी उमेदवार हाताचा पंजा या निशाणीवर उभे केले होते. त्यापैकी ८२ ठिकाणी काँग्रेसचे उमेदवार निवडून आले. त्यांचे विजयाचे हे प्रमाण ४६ टक्के आहे. भारतीय जनता पक्षाला यावेळी शिवसेनेपेक्षा दोन जागांवर जास्तीचा विजय मिळाला आहे. खरे तर शिवसेनेने भारतीय जनता पक्ष हा महाराष्ट्रात कमकुवत व दुर्बल असल्यामुळे त्यांना सापत्नभावाची वागणुक




*उपमुख्यमंत्री निवडीच्या वेळी मुंबईच्या राष्ट्रवादी भवनात झालेली कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी.*

देऊन कमी जागा दिल्या होत्या. काँग्रेस पक्ष जसा राष्ट्रवादीशी जागा वाटपात वागला तशीच वागणूक शिवसेनेची भाजपबरोबर होती. भाजप हा पक्ष महाराष्ट्रातून जवळपास संपला आहे असे खाजगीत काही शिवसेना नेते बोलूनही दाखवित होते. प्रत्यक्षात निवडणुकीत शिवसेनेपेक्षा दोन जागा अधिक मिळवून भाजपने आम्ही तुमच्यापेक्षा वरचढ आहोत हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखविले आहे. भाजपचे विजयाचे प्रमाण ४० टक्के तर शिवसेनेचे २५ टक्के आहे. चारही प्रमुख राजकीय पक्षांचे विजयाचे हे प्रमाण बघितले तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची कामगिरी सर्वांत जास्त चांगली, ठसठशीत व नजरेत भरावी अशी दैदिप्यमान आहे.

**प्रश्न : राज्यातील १० जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही उमेदवार निवडून आलेला नाही. तेथे पराभव कशामुळे झाला आणि त्या जिल्ह्यातील पक्षाची बांधणी आता आपण कशी करणार आहोत ?**

भुजबळ : जागा वाटपामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला चंद्रपूर जिल्ह्यात एकही जागा मिळालेली नव्हती. काही जिल्ह्यांमध्ये फक्त एक-दोन जागा मिळालेल्या होत्या. अनेक मतदान संघांचा निर्णय ऐनवेळी करावा लागल्यामुळे उमेदवार शोधण्यापासून तयारी करावी लागली. त्यामुळे काही मतदारसंघात उमेदवारांना सर्व मतदारांपर्यंत पोहोचता आले नाही. आणि पक्षाने केलेले कामही कार्यकर्ते तितक्या प्रभावीपणाने शेवटच्या माणसापर्यंत घराघरात नेऊ शकले नाहीत. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भ या दोन्ही विभागांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला मिळालेले यश हे पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत थोडं कमी आहे. पण त्या ठिकाणी आता यापुढील काळात लक्ष देण्याचे आम्ही ठरविले आहे. ज्या १० जिल्ह्यात आमचा एकही उमेदवार निवडून आलेला नाही तिथे शेजारच्या जिल्ह्यातील मंत्री, संपर्क मंत्री तसेच काही प्रमुख नेते व कार्यकर्ते यांच्यावर जबाबदारी सोपवून पक्ष बांधणीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेतला जाईल आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व मंत्री त्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहून त्यांचे प्रश्न व अडीअडचणी प्राधान्याने सोडविण्याकडे लक्ष देतील. याबाबतच्या स्पष्ट सुचना आमच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी आम्हा सर्वांना दिलेल्या आहेत. पक्षाचा

आदेश शिरोधार्य मानून त्यांच्याशी वेळोवेळी सल्लामसलत व चर्चा करून कार्यकर्त्यांना ताकत देण्याचा प्रयत्न केला जाईल.

**प्रश्न : मंत्री आणि आमदारांकरिता पक्षशिस्तीची काही आचारसंहिता आवश्यक वाटते का ?**

भुजबळ : आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार हे शिस्तीच्या बाबतीत अत्यंत कडक आहेत. त्यांची सामाजिक बांधिलकी, जनसेवेबाबतची निष्ठा, लोककल्याणाची तळमळ आणि वैचारिक बैठक ही फार पक्की आहे याची सर्वांना माहिती आहेच. प्रचंड राजकीय अनुभव व शहाणपण, मुरब्बीपणा, बारीकसारीक गोष्टींची इत्यंभूत माहिती यामुळे राज्यातील सर्व घडामोडींवर व मंत्र्यांच्या आणि आमदारांच्या कामावर त्यांची करडी नजर असते. असे असले तरीही सरकारच्या सर्व दैनंदिन निर्णयांमध्ये लक्ष घालण्याइतका वेळ त्यांच्यापाशी असणं शक्य नाही. कारण देशाची कृषी व अन्न नागरी पुरवठा विभागाची खुप मोठी जबाबदारी त्यांच्यावर आहे. त्यामुळे मंत्री व आमदार यांनी पक्षशिस्तीच्या चौकटीत काम करावे अशी त्यांची नेहमीच अपेक्षा असते. पक्षाच्या नावलौकिक व प्रतिमेला कोणत्याही परिस्थितीत तडा जाता कामा नये याबाबत ते फार आग्रही व कठोर असतात. यासंबंधी त्यांनी आपली भूमिका फार स्पष्टपणाने मंत्र्यांच्या नुकत्याच घेतलेल्या बैठकीत मांडली आहे. त्यांच्या सुचनेनुसार सर्व मंत्री सरकारमध्ये काम करतील याविषयी माझ्या मनात काहीही शंका नाही. तरीदेखील कामाची व्यवस्थित घडी बसावी म्हणून जर काही नियम वा चौकट तयार करावयाची असेल तर त्याबाबतचा निर्णय श्री. पवार साहेबांनी घ्यावा. आमची त्याला संमती राहील.

**प्रश्न : पक्षाची जनमानसातील प्रतिमा सुधारण्यासाठी कोणते बदल आवश्यक वाटतात ?**

भुजबळ : पक्षाने गेल्या १० वर्षांत विविध क्षेत्रांत विकासाचे खुप काम केलेले आहे. परंतु हे सर्व काम आम्ही अद्याप तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवू शकलेलो नाही. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हे काम शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवावे म्हणून कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. अनेक कार्यकर्त्यांना अजून सर्व योजनांची व्यवस्थित, पुरेशी माहिती नाही. पक्षाची नेमकी ध्येयधोरणे, वैचारिक बैठक,




*उपमुख्यमंत्रीपदाचे नाव जाहीर करण्यासाठी राष्ट्रवादी भवनात झालेल्या पत्रकार परिषदेला उपस्थित असलेले सर्वश्री प्रफुल्ल पटेल, आर. आर. पाटील, छगन भुजबळ व पक्षाचे प्रवक्ते हेमराज शहा.*



*उपमुख्यमंत्रीपदाचे नाव निश्चित करण्यासाठी राष्ट्रवादी भवनात झालेल्या बैठकीला उपस्थित असलेले मान्यवर नेते व आमदार*

तात्त्विक अधिष्ठान, कामकाजाची दिशा व जनतेचा संपादन करावयाचा विश्वास आणि प्रेम याबाबतचे मार्गदर्शन करण्यासाठी महिना दोन महिन्याचे प्रशिक्षण देणारी निवासी संस्था पक्षातर्फे काढली जाणे जरुरीचे आहे. या संस्थेमार्फत आपण कार्यकर्त्यांना अद्ययावत असे सर्व क्षेत्रातील प्रशिक्षण देऊ शकलो तर तो सक्षमपणे समाजामध्ये उभा राहु शकेल. पक्षाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शरद पवार यांच्या येत्या १२ डिसेंबरला येणाऱ्या सत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपण कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापनेची घोषणा करुन तिचे कामकाज सुरू करू शकलो तर कार्यकर्त्यांची मोठी सोय होऊन पक्षाचा नावलौकिक वाढण्यासही हातभार लागेल.

**प्रश्न : आगामी काळात सरकारने कोणत्या गोष्टी प्राधान्याने करावयाचे ठरविले आहे ? पक्षाने त्याबाबत मंत्र्यांना काही मार्गदर्शन केले आहे का ?**

भुजबळ : वीजेचा प्रश्न सोडवण्याला सरकार अग्रक्रम देणार असून २०११ पर्यंत वीज उत्पादनात राज्य अग्रेसर बनावे या दिशेने प्रयत्न करण्यात येत आहेत. पाटपाण्याच्या कामांना गती देण्यात येणार असून राज्याच्या वाट्याला आलेल्या पाण्याचा थेंबनथेंब अडविला जाईल या दृष्टीकोनातून प्रकल्पांची उभारणी केली जाईल. वर्षानुवर्षे रेंगाळलेले व काही कारणांमुळे अर्धवट पडलेले प्रकल्प तातडीने पूर्ण केले जातील. रस्त्याने सर्व गावे व खेडी एकमेकांना जोडण्याचा प्रयत्न आहे. शक्यतो खाजगीकरणातुन इन्फ्रास्ट्रक्चरची मोठी कामे पूर्ण करून लहान व छोटी-छोटी कामे पूर्ण करण्यासाठी सरकारचा पैसा वापरण्याची योजना आहे. शिक्षणाचा दर्जा सुधारावा व शिक्षणाशिवाय कुणीही राहू नये यादृष्टीने शिक्षणाचे सावत्रिकीकरण व त्यासाठीच्या सुविधा उभ्या करण्याकडे लक्ष देण्यात येत आहे. महागाई मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. ती कमी करण्यासाठी शक्य ते सर्व उपाय योजण्यात येत आहेत. प्रसंगी रास्त धान्य दुकानांमधून डाळी, तेल, साखर यासारख्या वस्तुंचेही वाटप सुरु करण्यात आलेले आहे. विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असून केंद्रातून जास्तीत जास्त रक्कम आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाणार आहे. पक्षाने विकासकामांबाबत काही सुचना केल्यास त्याचाही मंत्री

जरुर विचार करतील.

**प्रश्न : भाजप सेना यांना जनतेनं का नाकारलं असावं ?**

भुजबळ : धर्म, भाषा, भावना, जात, संप्रदाय यासारख्या गोष्टींमध्ये आपण फार काळ लोकांना गुंतवून ठेवू शकत नाही. लोकांचे रोजचे रोजीरोटीचे, वस्त्रनिवाऱ्याचे मुलभूत प्रश्न आजही मोठ्या प्रमाणावर प्रलंबीत आहेत. लोकांना हे प्रश्न सोडविणारे सरकार हवे आहे. शेतकऱ्यांना पाणी, वीज, बी-बियाणे, सवलतीच्या दराने कर्ज देणारं सरकार अभिप्रेत आहे. शहरातील लोकांना मोनोरेल, पाणी, वीज, कारखान्यातील रोजगार, वाहतुक, निवाऱ्यासाठी जागा यांसारख्या गोष्टी हव्या आहेत. लोकांनी विकासाच्या मागे जायचा निर्णय घेतला. विकास काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच करू शकते यावर जनतेचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी सेना-भाजपकडे पाठ फिरवली असावी. युतीकडे विकासाच्या कामाबाबत काहीही मुद्दा व धोरण नाही आणि आम्ही अगोदरच सर्व प्रश्नांवरती प्रखरपणाने निर्णय घेतलेले होते. कर्जमाफीपासून शेतीमालाच्या आधारभूत किंमती वाढविण्यापर्यंत आणि सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करेपर्यंत सर्व विषयांसंबंधी सरकारने ठोस निर्णय केलेले असल्यामुळे आणि जनतेला ते पसंत पडल्यामुळे भाजप-सेनेला त्यांनी नाकारले.

**प्रश्न : शिवसेना, मनसे आणि तिसऱ्या आघाडीबद्दल आपण काय सांगाल ?**

भुजबळ : शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे हे यावेळी प्रकृती बरी नसल्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात नव्हते. भारतीय जनता पक्षाचे जनाधार असलेले नेते श्री. प्रमोद महाजन हे ही दिवंगत झाल्यामुळे या निवडणुकीत नव्हते. मागच्या अनेक निवडणुकांमध्ये हे दोन्ही प्रमुख नेते होते. त्यांची अनुपस्थिती यावेळी निश्चितपणे जाणवली. शिवसेनेतून बाहेर पडलेल्या आणि मनसेची स्थापना केलेल्या श्री. राज ठाकरे यांचे ग्रहण शिवसेनेला लागलेले आहे. भाजपला महंमद अली जीनांच्या ग्रहणानं छळलेले आहे. त्यामुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत हा पक्ष खिळखिळीत बनला आहे. आज भाजपमध्ये कुणीही प्रभावी नेता राहिलेला नाही. वय व प्रकृती यामुळे श्री. बाळासाहेब ठाकरे हे प्रत्यक्ष लढाईत येऊ शकत नसल्यामुळे निवडणुकीतील रान पेटविण्याचे काम प्रभावीपणे होऊ शकले नाही. शिवसेना नेत्यांचा आज सारा वेळ अंतर्गत कलह सोडविण्यात जातो आहे. आणि सेनेवरती आता कोणाचीही पकड राहिलेली नाही. पूर्वी शिवसेनेत यायला दरवाजा आहे पण



बाहेर जायला दरवाजा नाही असे सांगितले जायचे. आता शिवसेनेत सगळीकडे दरवाजेच-दरवाजे दिसतात. शिवसेनेत कोण कधी आला आणि कधी गेला हे कळतच नाही एवढी नेतृत्वाची पकड ढिली झाली आहे. सुटली आहे. ऐन निवडणूकीच्या वेळेला दोन भावांचे भांडण जुंपले. कोण कोणाला साप म्हणतोय, उंदीर म्हणतोय. या आरोप-प्रत्यारोपातच पुष्कळ वेळ जाऊन लोकांची भरपूर करमणूक झाली. आता खंजीरही बरेच निघाले आहेत. कोण कुणामध्ये खंजीर खुपसतो आहे याबाबतचा काहीही ताळमेळ राहिलेला नाही. खंजीरदेखील बोथट झाले आहेत. तिसरी आघाडी हा तर बुडबुडाच होता. त्यातल्या त्यात वैयक्तिक यश शेकापला मिळाले आहे. पण आठवलेंच्या नेतृत्वाचा भोपळा फुटला आहे. पूर्वी आठवले यांना काही मतदार संघात मर्यादित असे यश मिळत होते. पण यावेळी तेही मिळालेले नाही. यावरून श्री. रामदास आठवले यांना आता कोणीच गांभीर्याने घेत नाही हे सिद्ध झालेले आहे. मनसेचे यश काही पॉकेटपुरतेच मर्यादित आहे. ते या पलिकडे जातील असे वाटत नाही. शिवसेनासुद्धा मराठीच्या मुद्द्यावरती एका मर्यादेच्या पलिकडे जाऊ शकली नव्हती म्हणून त्यांनाही आधारासाठी हिंदुत्वाचा मुद्दा घ्यावा लागला होता. आता या मुदयांना फारसा अर्थ प्राप्त होईल आणि लोक या मुद्द्यांकरिता त्यांच्या पाठीशी उभे राहतील असे वाटत नाही.

■■■

*राज्याचे नूतन गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री. आर. आर. पाटील यांनी विधानसभा निवडणूक निकालानंतर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व्यक्त केलेले हे विचार.*



# नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना संधी देऊ

**- आर. आर. पाटील**

या वेळच्या विधानसभा निवडणुकीत आमच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ११२ जागांवर उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ६२ उमेदवारांना निवडून देऊन पुन्हा एकदा राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ती आणून जनतेने आघाडीवर जो विश्वास व्यक्त केला आहे त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष या नात्याने मी महाराष्ट्रातील सर्व जनतेचे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व लहानथोर कार्यकर्त्यांचे व नेत्यांचे आणि धर्मनिरपेक्षतेवर विश्वास ठेऊन आम्हाला मतदान करणाऱ्या सर्व बंधु-भगिनींचे मनापासून आभार मानतो.

मागच्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी आमच्या आमदारांची संख्या ९ ने कमी झाली असली तरी काँग्रेसबरोबर झालेल्या जागा वाटपाच्या तडजोडीत आम्हाला १० जागा कमी मिळाल्या होत्या. आणि दोन जागांवरील उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे आम्हाला मिळालेल्या जागा कमी दिसत असल्या तरी महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही पक्षापेक्षा आमच्या विजयी झालेल्या उमेदवारांची टक्केवारी ही सर्वाधिक आहे. म्हणून



*राजभवनात राज्यपाल श्री. जमीर यांना भेटून त्यांच्याशी हस्तांदोलन करताना प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील व शेजारी श्री. छगन भुजबळ.*

“

**कोणत्याही राजकीय पक्षाची जनमानसातील प्रतिमा ही कार्यकर्त्यांचा आचारविचार, त्यांची वागणूक, त्यांची शिस्त, त्यांचा दृष्टीकोन आणि ते जपत असलेली मुल्ये यावर अवलंबून असते. अलिकडच्या काळात आणि विशेषतः निवडणुकीच्या राजकारणात जातीपातीला व पैशाला अनन्यसाधारण महत्व येऊ लागले आहे. विधानसभेच्या निवडणुकीत कोट्यावधी रुपये खर्च केले असे भूषण असल्यासारखे काही उमेदवार सांगू लागले आहे. लोकप्रबोधनातून या दुष्ट प्रवृत्ती कमी करणे ही आता काळाची गरज आहे. निव्वळ राजकारणातच नव्हे तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात या दुष्ट प्रवृत्ती आज मोठ्या प्रमाणावर शिरलेल्या दिसत आहेत त्यांचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न सर्व स्तरांवर आणि मुख्यत्वे राजकीय क्षेत्रातही करणे आवश्यक वाटते.**

”

या अर्थाने या विधानसभा निवडणुकीचा निकाल लोकसभेच्या पार्श्वभूमीवर पक्षाला बळ देणारा आहे. सहा ते सात ठिकाणी आमचे उमेदवार अतिशय कमी फरकाने पराभूत झालेले आहेत. याशिवाय बारा ते चौदा ठिकाणी आमच्या पक्षाला पाठिंबा देणारे बंडखोर उमेदवार निवडून आले आहेत. बंडखोरी थोडी कमी करण्यात आम्हाला यश आले असते आणि जागा वाटपाचा विचार करण्यासाठी व उमेदवारांना प्रचार करण्यासाठी आम्हाला आणखीन थोडा अवधी मिळाला असता तर ७५ पेक्षा जास्त जागांवर आमचे उमेदवार निश्चित निवडून आले असते. जागा वाटपात अगोदरच आमच्या वाट्याला जागा कमी आल्या. तिकीट वाटपाची बोलणी बराच काळ चालली. पक्षांतर्गत तिकीट वाटपालाही थोडा कालावधी गेला त्यामुळे विरोधकांच्या तुलनेत प्रचाराला व प्रत्येक मतदाराच्या घरापर्यंत पोहोचण्यास अवधी मिळाला नाही. म्हणूनही काही जागा कमी झाल्या आहेत.

राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही उमेदवार निवडून आलेला नसला तरीही त्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना आम्ही वाऱ्यावर सोडणार नाही. त्यांना आमचा पक्ष सर्व मंत्री आणि सरकार पाठिंबा देऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यात लक्ष घातले जाईल. आघाडीच्या जागा वाटपामध्ये सर्व जिल्ह्यात आम्हाला जागा मिळाल्या नव्हत्या. चंद्रपूरसारख्या जिल्ह्यात आमचा पक्ष एकही जागा लढवित नव्हता. विदर्भातील काही जिल्ह्यात आम्हांला फक्त एक-दोन जागा मिळाल्या होत्या. मुळात जागाच कमी मिळाल्याने विजयी उमेदवारांचे प्रमाण दहा जिल्ह्यात काहीच नाही असे चित्र दिसत असले तरीही विदर्भातील पराभवाचे आम्हाला आत्मपरिक्षण करावेच लागेल. कारण १२ पैकी फक्त ४ जागांवर येथे आमचे उमेदवार विजयी झाले आहेत. नागपूर व अन्य काही ठिकाणी पक्षाचेच जिल्हाध्यक्ष बंडखोरी करून उभे राहिल्यामुळे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची यंत्रणाही थोडी विस्कळीत झाली होती. बंडखोरीमुळे कार्यकर्तेही थोडे गोंधळलेल्या अवस्थेत होते. या सर्व पार्श्वभूमीचा आणि प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थितीचा मतदारसंघ निहाय आढावा व अभ्यास आम्ही निश्चितच करणार आहोत.




*राजभवनात झालेल्या शपथविधीच्या प्रसंगी राज्यपाल श्री. जमीर हे श्री. आर. आर. पाटील यांना मंत्रीपदाची शपथ देत असून व्यासपीठावर शेजारी छगन भुजबळ व अशोक चव्हाण.*




*मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर प्रतिज्ञापत्रावर सही करताना श्री. आर. आर. पाटील, शेजारी राज्यपाल श्री. जमीर, उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व मुख्यमंत्री अशोक चव्हाण.*

अहमदनगर, बीड आणि जळगाव या जिल्ह्यांमध्ये आम्हाला अपेक्षेपेक्षा थोडं जास्तीच यश मिळाले आहे. याला कारण सर्व कार्यकर्त्यांची एकजुट, त्यांनी विजयाचा केलेला निर्धार आणि विरोधी नेत्यांना आस्मान दाखविण्यासाठी नेते व कार्यकर्त्यांनी केलेले जीवाचे रान. पश्चिम महाराष्ट्र हा तर राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असून येथे आम्हांला काही ठिकाणी अनपेक्षीतपणे काही जागा गमवाव्या लागल्या आहेत. पण काही जागा विरोधकांकडून खेचून आणण्यात आम्हांला यशही आलेले आहे. या दहा जिल्ह्यांमध्ये पक्षाचा एकही आमदार निवडून आलेला नाही. तिथे नव्याने पक्ष बांधणी करावी लागेल. तिथल्या विकासकामांना चालना देत कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे कामही आम्ही निश्चित करू. पक्षाची निवडणूक प्रक्रिया आता सुरू झाली असून नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना संधी देण्याचा आमचा निश्चित प्रयत्न राहील.

गेल्या दहा वर्षांत श्री. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली विकसीत झालेला व वाढलेला राष्ट्रवादी काँग्रेस हा आमचा शिस्तबद्ध पक्ष आहे. पक्षात तुरळक ठिकाणी जी गटबाजी आहे ती चर्चेने कमी करण्याचा आम्ही निश्चितच प्रयत्न करू आणि जिथे गटबाजी कमी होणार नाही, कार्यकर्ते पक्षाच्या शिस्तीला धरुन वागणार नाहीत. तिथे धाडसी वजाबाक्यासुद्धा करण्याची आमची तयारी राहील. जात, धर्म-पंथ, संप्रदाय, लिंग यांच्या पलिकडे जाऊन सगळ्या जातीधर्मांना आपला वाटेल व छत्रपती शाहु महाराज, म. ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहे आंबेडकर यांचा पुरोगामीपणाचा विचार टिकविण्यासाठी व तो वृद्धींगत करण्यासाठी आमचा पक्ष कटीबद्ध राहील.

कोणत्याही राजकीय पक्षाची जनमानसातील प्रतिमा ही कार्यकर्त्यांचा आचारविचार, त्यांची वागणूक, त्यांची शिस्त, त्यांचा दृष्टीकोन आणि ते जपत असलेली मुल्ये यावर अवलंबून असते. अलिकडच्या काळात आणि विशेषतः निवडणुकीच्या राजकारणात जातीपातीला व पैशाला अनन्यसाधारण महत्व येऊ लागले आहे. विधानसभेच्या

निवडणूकीत कोट्यावधी रुपये खर्च केले असे भूषण असल्यासारखे काही उमेदवार सांगू लागले आहे. लोकप्रबोधनातून या दृष्ट प्रवृत्ती कमी करणे ही आता काळाची गरज आहे. निव्वळ राजकारणातच नव्हे तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात या दृष्ट प्रवृत्ती आज मोठ्या प्रमाणावर शिरलेल्या दिसत आहेत त्यांचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न सर्व स्तरांवर आणि मुख्यत्वे राजकीय क्षेत्रातही करणे आवश्यक वाटते.

विरोधी पक्षातील विसंवाद, त्यांचे अंतर्गत कलह व धुसफूस, नेत्यांचा कमकुवतपणा आणि कार्यकर्त्यांना न राहिलेला धाक, मनसेनं केलेली मतविभागणी आणि मागील पाच वर्षांत आघाडी सरकारने उत्तम पद्धतीने केलेले विकासाचे प्रचंड काम यामुळे लोकशाही आघाडीला घवघवीत यश देत महाराष्ट्रातील जनतेने तिसऱ्यांदा कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेसवर विश्वास व्यक्त केला आहे. मिळालेल्या सत्तेइतकीच राज्यासमोरची आव्हानेही तितकीच महत्वपूर्ण आहेत. आम्ही सर्व कार्यकर्ते श्री. पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आणि केंद्रसरकारच्या मदतीने या आव्हानांचा निश्चितपणे सामना करू शकू असा मला विश्वास आहे.

आज राज्यापुढे महागाई, बेकारी, विजेची टंचाई, सिंचन असे अनेक आव्हानात्मक प्रश्न आ वासून उभे आहेत. राज्याचा जीडीपी वाढत असला तरी गरीब आणि श्रीमंत यांच्यात वाढत असलेले अंतर ही मोठी चिंताजनक बाब आहे. गरीबांच्या मुलांना दिले जाणारे शिक्षण आणि श्रीमंतांच्या मुलांना मिळणारे शिक्षण यात वाढत असलेली दरी ही भविष्याच्या दृष्टीने निश्चितच योग्य नाही. दलित - आदिवासी, अल्पसंख्यांक आणि महिला या विकासापासून वंचीत राहणार नाहीत याचीही काळजी घ्यावी लागणार आहे. भाषा, जात, धर्म, संप्रदाय यातील वादाने ज्या समाजघटकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे तीही कमी करून राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाणार नाही याचीही दक्षता घ्यावी लागणार आहे. काही भागात विशेषतः गडचिरोलीसारख्या ठिकाणी नक्षलवाद्यांचा धुमाकूळ तर मुंबईला लक्ष्य करण्याचा नेहमीच अतिरेक्यांनी केलेला प्रयत्न या पार्श्वभूमीवर सरकारने सुरक्षिततेसाठी केलेल्या सर्व प्रयत्नांना पक्ष संघटना मजबुतीने साथ देईल. राहिलेली शिल्लक कामे ही विरोधकांच्यामार्फत नेहमीच जनतेसमोर आणली जातात. परंतु पक्षाने व सरकारने केलेली चांगली कामे मात्र लोकांपर्यंत पोहोचविण्यात पक्ष कार्यकर्ते मात्र पुढाकार घेत नाहीत. ही उणिव भरून काढण्याची गरज आहे. त्या दृष्टीने कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊन लोकसेवेसाठी तयार केले जाईल.

■■■



*उपमुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर श्री. छगन भुजबळ यांना अलिंगन देऊन प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी शेजारी पक्षाचे सरचिटणीस गुरूनाथ कुलकर्णी.*




जयंत पाटील




सुनील तटकरे



डॉ. विजयकुमार गावीत




राजेश टोपे



गणेश नाईक




हसन मुश्रीफ



बबनराव पाचपुते



७ नोव्हेंबर रोजी मुंबईच्या राजभवनात झालेल्या शपथविधी समारंभाची क्षणचित्रे. अजित पवार आपल्या पत्नी सौ. सुनेत्रा पवार यांच्यासह राजभवनात येताना.



अनिल देशमुख




प्रा. लक्ष्मण ढोबळे



जयदत्त क्षी




प्रकाश सोळंके




भास्कर जाधव



गुलाबराव दे



रसागर




मनोहर नाईक




रामराजे नाईक–निंबाळकर



कर




सचिन अहिर




फौजिया खान